
अभिरुची

नोव्हेंबर २०२६, दिवाळी अंक



HAPPY

DIWALI



sanskrit
new age indian

916-817-4356
www.sanskritindian.com

mantra
vegan & vegetarian

916-999-1749
www.mantraindian.com

CHICAGO'S PIZZA
With A Twist

916-970-9900
folsomchicagospizzatwist.com

PROUD TO SUPPORT
THE MARATHI MANDAL SACRAMENTO

मराठी संस्कृतीचा स्पर्श
दिवाळीच्या प्रकाशात

—



—

शब्दांच्या आणि
चित्रांच्या दीपोत्सवी
प्रवासात आपलं
स्वागत!

वर्ष २१वे

Marathi Mandal Sacramento
मराठी मंडळ सॅक्रमेंटो

संपादिका
स्मिता कुलकर्णी

दिवाळी २०२६

2026 Committee

President: **Sandesh Malpure**
Secretary: **Vijay Warpe**
Joint Secretary: **Swapnil Chalekar**
Treasurer: **Prakash Patil**
Joint Treasurer: **Harsh Barve**

Abhiruchi Editor: **Smita Kulkarni**
Youth Representative: **Aaryan Patil**
BMM Representative: **Amar Pawar**
IAS Representative: **Vinayak Patil**
Auditor: **Mridula Chordia**

Marathi Shala Coordinators:
Yatin Korde
Sukhada Mangrulkar
Manisha Patil
Pallavi Sawant

Marathi Shala Treasurer: **Amol Joshi**

Webmaster: **Vikrant Sawant**



प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक आणि मंडळ सहमत असेलच असे नाही
लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक व मंडळाकडे आहेत

MMSac is a 510 (c)(3) non-profit organization. EIN: 26-4515651
आमच्या सर्व प्रायोजकांचे त्यांच्या उदारआणि सातत्यपूर्ण पाठिंब्यासाठी मनापासून आभार

अनुक्रमणिका

संपादकीय	स्मिता कुलकर्णी	7
अध्यक्षीय	संदेश मालपुरे	9
परंपरा, संस्कार आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सुंदर संगम	वृषसेन दखने	13
भगवान गणेश	उर्वी वृषसेन दखने	15
गणपती बाप्पा मोरया!	समायरा ब्रीद	16
बटर स्किशीची गोष्ट	सोनल ब्रीद	17
निसर्गाच्या कुशीत, मैत्रीच्या सहवासात... पाइनक्रेस्ट कॅम्पिंगची अविस्मरणीय सफर	वैशाली देवरे	19
कवितेच्या दालनात:		
विचार	प्रीती देशपांडे	24
दिवाळीचा प्रवास	प्रीती देशपांडे	24
माझी अमेरिका वारी	श्रीपाल लालवानी	25
अमेरिकेतल्या घराची हसरी ओळख	प्रभाकर मालपुरे	25
पांडुरंगा	मुरलीधर अडेट्टीवार	26
तूही तेरा ईश हैं	अजित नातू	27
त्याला काय म्हणतात	अजित नातू	27
धाड	पांडुरंग भोसले	28
लेख आणि कथा विश्व:		
बंधने बांधली कुणी, आयुष्ये सांधली कुणी	प्रीती देशपांडे	29
वा गुरु !!!	संदीप बिडये	31
मिलाफ	ज्योती रानडे	33
जुन्याचं नवं रूप	स्मिता कुलकर्णी	36
My Mandala Art	केट डीरोजीयर	38
मृत्यूच्या दरीतून परतताना... एक अविस्मरणीय अनुभव	आशिष पुजारी	39
MMSac Special Community Recognition	संदेश मालपुरे	43
Kids Making a Difference:		
E.A.R.T.H.	अत्रेय कुलकर्णी	44
Family House: A Nonprofit Organization	आभा रानडे	45
चला बनवूया आकाशकंदील	वरद कोरडे	46
आणखी बरंच काही:		
जेव्हा मी अखेरचा निरोप घेईन	अजित नातू	48
काही चित्रे	ईरा भोसले	50
माझे वडील	सतीश अडेट्टीवार	53
Making Your Charitable Giving Go Further	राहुल साठे	54
उखाणे	संदेश, मोहिनी बर्वे, उपेंद्र कुलकर्णी	56
2026 - A Year That Filled My Heart	संदेश मालपुरे	57





SAGEVIEW REALTY + LENDING

FAMILY OWNED



VANDAN PATEL
LOAN OFFICER



BHAKTI PATEL
REAL ESTATE



MUNEE PATEL
BROKER

Residential + Commercial Real Estate
Investment · Lending · All Types of Financing

279-279-4663 · www.sageview.us
DRE# 02248794 | NMLS# 2637506

संपादकीय

नमस्कार मंडळी!

अभिरुचीचा दिवाळी अंक मंडळाच्या सभासदांपर्यंत पोहोचवताना किती आनंद होत आहे, हे शब्दांत सांगणे कठीण आहे! दरवर्षी दिवाळी येते ती आठवणी आणि माणसांना पुन्हा एकत्र आणण्याचे निमित्त घेऊन. अभिरुचीचा हा अंकही तुम्हा सर्वांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त आणि भरघोस प्रतिसादामुळे अशाच अनेक अनुभवांना, आठवणींना आणि कल्पनांना घेऊन तुमच्या पुढे ठेवत आहे. अभिरुचीची आकर्षक जाहिरात तयार केल्याबद्दल नम्रता येवले हिचे विशेष आभार. तिने माझी विनंती सुंदर व्हिडिओद्वारे तुमच्यापर्यंत पोहोचवली, त्यामुळे आज हा ६४ पानी अंक तुमच्या हाती देताना आनंदासोबत एक वेगळे समाधानही वाटत आहे.

हवेतल्या गारव्याने ऋतुबदलाची चाहूल दिली आहे. रस्त्यांवर विखुरलेल्या लाल, पिवळ्या, केशरी पानांच्या रंगोत्सवातून दिवाळीच्या आठवणी जाग्या होतात. निसर्गाच्या याच रंगोत्सवाची मोहक छटा यंदाच्या अंकाच्या मुखपृष्ठावर खुलली आहे. मुखपृष्ठावरील रांगोळी ही माझी सून केट डीरोजीयर हिची कल्पक कलाकृती आहे. पारंपरिक भारतीय रांगोळी आणि आधुनिक मंडाला शैली यांचा सुंदर संगम साधणारी ही कलाकृती विविध संस्कृतींना जोडणारा एक सुंदर सेतू आहे. तिच्या वर्तुळाकार रचनेतून जीवनचक्र, ऋतूंचे फेर आणि समृद्धीचे प्रतिमात्मक दर्शन घडते.

अंकाची सुरुवात आपल्या सर्वांच्या लाडक्या बाप्पावरील लेखाने होते. वृषसेन दखने आणि त्यांच्या परिवाराने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून साजऱ्या केलेल्या गणेशोत्सवाचे सुरेख वर्णन या लेखात वाचायला मिळते. परंपरा आणि तंत्रज्ञान यांची अप्रतिम सांगड घालत त्यांनी केलेली बाप्पाची आरास विशेष लक्ष वेधून घेते. त्यांची कन्या उर्वीने साकारलेले बालगणेशाचे चित्रही तितकेच आकर्षक आणि मनमोहक आहे. मराठी शाळेतील किंडरगार्टनची विद्यार्थिनी समायरा ब्रीद, हिने रेखाटलेले बाप्पाचे निरागस चित्र तुम्हाला नक्कीच आवडेल. त्यासोबतच तिची ताई अंजलीने समायरासाठी प्रेमाने काढलेले खास चित्र तिच्या कल्पकतेची सुंदर झलक दाखवते. मराठी शाळेत शिकणाऱ्या छोट्या वरद कोरडेने आकाशकंदील बनवण्याच्या वर्कशॉपमध्ये सहभागी होऊन शिकलेले नवे कौशल्य त्याच्याच गोड भाषेत वाचायला विसरू नका.

जुलै महिन्यात झालेल्या कॅम्पिंग सहलीत सहभागी झालेल्या सभासदांना वैशाली देवरे यांचा लेख वाचताना पाइनक्रेस्टमधील निसर्गरम्य क्षण पुन्हा अनुभवता येतील. सहलीचे त्यांनी केलेले जिवंत आणि ओघवते वर्णन वाचताना मी सुद्धा त्या सुंदर वातावरणात रमून गेले.

या वेळच्या कवितांमध्ये दिवाळीचा उत्सवी जल्लोष, अमेरिकेच्या पहिल्या प्रवासाच्या गंमतशीर आठवणी, जीवनाच्या अर्थाचा वेध घेणारे चिंतनशील विचार आणि वारीची भक्तिरसपूर्ण अनुभूती अशा विविध विषयांचा सुंदर संगम अनुभवायला मिळतो. आपल्या कवयित्री प्रीती देशपांडे आणि कवी अजित नातू यांच्या रचनांबरोबरच मृदुला चोरडिया यांचे वडील श्रीपाल लालवानी, सतीश अडेट्टीवार यांचे वडील मुरलीधर अडेट्टीवार, संदेश मालपुरे यांचे वडील प्रभाकर मालपुरे आणि प्रीतम भोसले यांचे वडील, पांडुरंग भोसले अशा ज्येष्ठ कवींनी दिलेल्या कविता या विभागाला विशेष समृद्ध करतात.

या वर्षीच्या दिवाळी अंकाचा मुख्य विषय आहे, "जुलै ते नोव्हेंबर दरम्यान महाराष्ट्रात साजरे होणारे सण आणि त्याच काळात अमेरिकेत साजरे होणारे विशेष दिवस". या संकल्पनेला विविध लेखकांनी आपापल्या अनुभवांनी आणि दृष्टिकोनांनी समृद्ध केले आहे. रक्षाबंधनाच्या निमित्ताने प्रीतीने शब्दबद्ध केलेला बहीण-भावाच्या नात्यावरील लेख हृदयस्पर्शी तर आहेच, पण जीवनमूल्यांचीही सुंदर आठवण करून देतो. दुसरीकडे, गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने संदीप बिडये यांनी मित्रांच्या नात्यावर लिहिलेला लेख विनोद आणि आठवणींची सुरेख मेजवानी ठरतो. दिवाळी आणि थँक्सगिव्हिंग या दोन संस्कृतींच्या सुंदर संगमातून उलगडणारे भावविश्व, माझी बालपणापासूनची मैत्रीण, ज्योती रानडे हिच्या "मिलाफ" या कथेत अनुभवायला मिळेल. त्याच कल्पनेच्या प्रेरणेने सुरू झालेल्या, जुन्या वस्तूंना नवजीवन देणाऱ्या माझ्या हस्तकला निर्मिती छंदाविषयीही या अंकात थोडंसं वाचायला मिळेल. तसेच, माझी सून केट हिने

तयार केलेली आणखी एक आकर्षक रांगोळी भारतीय आणि अमेरिकन संस्कृतींना जोडणाऱ्या सुंदर नात्याची परत एकदा साक्ष देईल.

मित्रांबरोबर केलेल्या प्रवासात अनुभवलेला एक रोमांचकारी प्रसंग आशिष पुजारी यांच्या लेखातून उलगडत जातो. यासोबतच, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून त्यांनी तयार केलेली अंकातील विविध चित्रे बालपणीच्या दिवाळीच्या आठवणींना उजाळा देत, तुम्हाला पुन्हा त्या आनंदमय दिवसांत घेऊन जातील. विविध माध्यमे वापरून रेखाटलेली ईरा भोसले यांची चित्रे अंकाच्या सौंदर्यात आणखी भर घालतात.

समाजासाठी निःस्वार्थपणे योगदान देणाऱ्या अत्रेय कुलकर्णी आणि आभा रानडे या तरुणांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. त्यांच्या प्रेरणादायी सामाजिक कार्याचा गौरव आपले अध्यक्ष संदेश मालपुरे यांनी आपल्या लेखातून केला आहे. तसेच, समाजोपयोगी कार्यासाठी देणगी देण्याची इच्छा असलेल्या वाचकांना राहुल साठे यांनी चॅरिटेबल गिव्हिंगसंदर्भात दिलेल्या उपयुक्त आणि करबचतीच्या टिप्स नक्कीच मार्गदर्शक ठरतील.

अखेरच्या निरोपाच्या विषयाला स्पर्श करणारा अजित नातू यांचा लेख वाचताना कवी भा. रा. तांबे यांच्या "जन पळभर म्हणतील हाय हाय" या गीतातील जीवनतत्त्वज्ञानाची प्रकर्षाने आठवण होते. डॉ. मुरलीधर अडेट्टीवार यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाची ओळख करून देणारा लेख मनात आदर आणि कृतज्ञतेची भावना जागवतो. दोन वर्षांच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत मनात साठलेल्या असंख्य आठवणी, जपलेली नाती आणि अनुभवांचे रंगीत क्षण संदेश यांनी आपल्या लेखात शब्दबद्ध केले आहेत. त्या आठवणींच्या प्रवासात तुम्हीही नकळत सहप्रवासी व्हाल.

संदेश यांचे उखाणे आणि मोहिनी बर्वे यांनी उलगडलेला त्यांच्या काळातील रोमॅन्स वाचताना, "खरंच, ते दिवस काही औरच होते!" असे म्हणत तुम्ही नकळत हसायला लागाल. त्यात माझे पतीदेव उपेंद्र यांनी रचलेल्या खुमासदार उखाण्यांची भर पडल्याने हा विभाग दिवाळीच्या फराळातील चकली, चिवडा आणि लाडवांसारखाच रंगतदार झाला आहे.

दिवाळीच्या फराळाचा आस्वाद घेताना या अंकातील प्रत्येक पान आवर्जून वाचा. कदाचित एखादा लेख तुम्हाला बालपणाच्या आठवणीत रमवेल, एखादी कविता नव्या विचारांची दारे उघडेल, तर एखादे चित्र मनात कायमचे घर करून बसेल. लेखक, कवी आणि कलाकारांना आपल्या अभिप्रायाची प्रेमळ भेट द्यायला विसरू नका.

या अंकाच्या निर्मितीमागे अनेकांचे सहकार्य आहे. मंडळाचे अध्यक्ष, संदेश मालपुरे यांनी वेळोवेळी दिलेली स्फूर्ती आणि त्यांनी माझ्यात दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी त्यांची मनापासून ऋणी आहे. विशेषतः संपादनाच्या कामात माझे पतीदेव उपेंद्र यांनी दिलेला मोलाचा हातभार आणि सातत्यपूर्ण साथ याबद्दल त्याचे खूप आभार. या अंकासाठी वेळ, विचार आणि प्रतिभेचे योगदान देणाऱ्या सर्व लेखक, कवी, कलाकार आणि स्वयंसेवकांचे मनःपूर्वक आभार. **आपल्या सर्वांना दीपावली आणि थँक्सगिव्हिंगच्या हार्दिक शुभेच्छा!**

-स्मिता कुलकर्णी



अध्यक्षीय

मंडळी,

आपल्या आयुष्याच्या प्रवासात आपण अनेक माणसांना भेटत असतो. काही आपले नातेवाईक असतात, काही मित्र होतात, तर काही काळाच्या प्रवाहात एखाद्या लहरीसारखे आपल्या आयुष्यात येतात आणि पुढे निघून जातात. प्रत्येकाची आपल्या जीवनात एक वेगळी जागा असते. काही लाटा सुखद असतात, तर काही आपली कसोटी पाहतात. पण प्रत्येक भेटीतून, प्रत्येक अनुभवातून काहीतरी शिकण्यासारखे नक्कीच असते. काही व्यक्ती आपल्याला प्रत्यक्ष प्रेरणा देतात, तर काही नकळत एखादा सूक्ष्म पण कायम लक्षात राहणारा संदेश देऊन जातात.

Seattle येथील BMM अधिवेशनात निवृत्त लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर यांचे विचार ऐकण्याची संधी मिळाली. त्यांच्या भाषणात महाराष्ट्रीय समाजाची जिद्द, दृढनिश्चय, सामर्थ्य आणि बदलत्या जगाला सामोरे जाण्याची क्षमता यांचा सुंदर प्रत्यय आला.

आपली मुळे घट्ट धरून ठेवतानाच नव्या क्षितिजांकडे कसे पाहावे, देशांच्या आणि संस्कृतींच्या सीमा ओलांडून इतरांना कशी प्रेरणा द्यावी, याचा संदेश त्यांच्या विचारांतून जाणवत होता. विशेषतः तरुण पिढीला त्यांनी रूढ चौकटी मोडण्याचे, वेगळ्या वाटा निवडण्याचे आणि स्वतःचे आकाश शोधण्याचे आवाहन केले. आपल्या महिलांमध्ये नेतृत्व, धैर्य आणि कौशल्य हे स्वाभाविकपणे आहे, असे त्या आत्मविश्वासाने म्हणाल्या — आणि त्यांच्या स्वतःच्या कर्तृत्ववान जीवनाने त्यांनी ते सिद्धही केले आहे. प्रत्येक मराठी माणसाला अभिमान वाटावा असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व आहे.

त्यांच्या भाषणातील आणखी एक गोष्ट मला विशेष आवडली— मराठी आणि English या दोन्ही भाषांचा त्यांनी अत्यंत सहजपणे केलेला वापर.

त्याच वेळी आपल्या संपादिका स्मिता कुलकर्णी यांच्याशी माझे याबद्दल हितगुज झाले. आम्हा दोघांनाही एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली — आपल्या पुढच्या पिढीशी दृढ नाते जोडायचे असेल, तर त्यांच्यापर्यंत पोहोचणाऱ्या भाषेत आपण त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे.

आपण अमेरिकेत राहणारे मराठी आहोत. ही ओळख आपल्याला दोन समृद्ध संस्कृतींशी जोडते. महाराष्ट्राने आपल्याला कुटुंबभावना, संस्कार, कष्ट, शिक्षणाची ओढ, सामाजिक बांधिलकी आणि आपल्या मुळांचा अभिमान दिला. अमेरिकेतील जीवनाने आपल्याला विविधतेचा आदर, समान संधी, स्वतंत्र विचार, नवकल्पनांचे स्वागत आणि वेगवेगळ्या संस्कृतींना खुल्या मनाने स्वीकारण्याची दृष्टी दिली. या दोन संस्कृतींपैकी एक निवडण्याची गरज नाही. आपल्या पुढच्या पिढीला दोन्ही संस्कृतींमधील उत्तम मूल्यांचा वारसा देता येईल — आणि कदाचित हीच आपली सर्वात मोठी ताकद आहे.

मुलांना मराठी जरूर शिकवा. आपले सण, परंपरा, इतिहास, साहित्य आणि संस्कृती यांची ओळख नक्कीच करून द्या. पण त्याचबरोबर त्यांना चांगले, संवेदनशील, आत्मविश्वासपूर्ण आणि समाधानी global citizens बनण्यास मदत करूया. त्यांना त्यांच्या मराठी मुळांचा अभिमान वाटावा, पण इतर भाषा, संस्कृती आणि विचार यांचाही तितकाच आदर करता यावा.

आपल्या मुलांपर्यंत मराठी संस्कृतीचे विचार English मधून अधिक प्रभावीपणे पोहोचत असतील, तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. संस्कृती टिकवणे म्हणजे केवळ भाषा टिकवणे नव्हे; त्या भाषेमागील मूल्ये, विचार, इतिहास, संवेदनशीलता आणि समाजभावना पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे.

याच विचारातून **अभिरुची** मध्ये आम्ही English लेखांनाही प्रोत्साहन दिले आहे. नव्या पिढीने या अंकातील English articles आवर्जून वाचावेत. मराठी लेखही वाचले तर दुधात साखर!

आज AI आपले जग बदलत आहे. भाषा, शिक्षण, काम करण्याच्या पद्धती आणि संवादाची माध्यमे वेगाने बदलत आहेत. या बदलांना घाबरण्याऐवजी त्यांचा स्वीकार करूया. तंत्रज्ञानाचा उपयोग आपल्या संस्कृतीला दूर नेण्यासाठी नव्हे, तर नव्या पिढीच्या आणखी जवळ नेण्यासाठी करूया.

आपल्या समाजात कर्तृत्वाची कमतरता नाही. आता त्या कर्तृत्वाबरोबर आपल्या पुढच्या पिढीला प्रेरणा देण्याची जबाबदारीही आपली आहे.

ही प्रेरणा आहे त्या मराठी मातीची,
ही प्रेरणा आहे शिवरायांच्या धैर्याची,
ही प्रेरणा आहे समर्थांच्या विचारांची —
पण तिची दृष्टी आहे आजच्या जगाकडे आणि उद्याच्या नव्या क्षितिजांकडे.

-संदेश मालपुरे
अध्यक्ष
सॅक्रॅमेंटो महाराष्ट्र मंडळ





आशिष पुजारी यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांच्या साहाय्याने साकारलेली चित्रे

THINKING OF BUYING OR SELLING A HOME?

Your premier source for real estate expertise.

BK KATRAGADDA

Your Neighborhood Realtor®

916-800-7788

BK05@kw.com

BKayRealty.com



Bkay REALTY GROUP

Style to design

kw DANVILLE
KELLERWILLIAMS. REALTY

DRE # 02090623

परंपरा, संस्कार आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सुंदर संगम

वृषसेन दखने



२०१८ पासून आमच्या घरी गणपती बाप्पांचे आगमन होत आहे. आमच्यासाठी गणेशोत्सव म्हणजे केवळ सजावट किंवा उत्सव नसून, मुलांपर्यंत आपली संस्कृती, परंपरा आणि संस्कार पोहोचवण्याचा एक सुंदर प्रयत्न आहे. बाप्पांच्या अकरा दिवसांच्या उत्सवाची तयारी आम्ही एक-दोन महिने आधीच सुरू करतो. सजावटीची कल्पना, साहित्याची जमवा जमव, प्रत्यक्ष निर्मिती आणि अंतिम सजावट या प्रत्येक टप्प्यात संपूर्ण कुटुंब सहभागी होते.

सुरुवातीला पुठ्ठ्यापासून मंदिर आणि कारंजे बनवण्यापासून सुरू झालेला हा प्रवास दरवर्षी काहीतरी नवीन शिकवत गेला. यंदा आमचे आई-बाबा घरी आले होते. त्यांनी आणलेल्या थर्माकोलच्या साहित्यापासून अक्षरधाम मंदिराची प्रतिकृती उभारण्याची कल्पना सुचली. पहिल्या नजरेला साधी वाटणारी ही संकल्पना प्रत्यक्षात मात्र आजवरच्या सर्व सजावटींपैकी सर्वाधिक आव्हानात्मक ठरली! अनेक अडचणी, बदल, प्रयोग आणि कधी निराशा, तर कधी नव्या उत्साहाने आम्ही सगळे मिळून काम करत राहिलो. अखेर शेवटच्या दोन दिवसांत सर्वांनी हातभार लावला आणि आमची सजावट पूर्णत्वाला गेली. त्या प्रक्रियेत मंदिराबरोबरच आमच्या कुटुंबातील सहकार्य, संयम आणि एकजूटही अधिक घट्ट झाली.

यंदाच्या सजावटीला आणखी एक वेगळा आयाम मिळाला तो माझ्या कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्षेत्रातील कामामुळे.



आधुनिक तंत्रज्ञान आणि बाप्पांच्या बुद्धीचे प्रतीक यांची सांगड घालण्याची कल्पना मनात आली. त्यातून साकारली संकल्पना — "बुद्धी दे बाप्पा... AI ला दिशा दे बाप्पा!"



ChatGPT, Claude, Gemini, Copilot, Perplexity आणि Meta Muse अशा विविध AI साधनांना बाप्पांचे वेगवेगळे सहाय्यक म्हणून दाखवले. कोणी ज्ञान मिळवून देणारे, कोणी विश्लेषण करणारे, कोणी संशोधन करणारे, तर कोणी नियोजन करून कृतीत मदत करणारे! या सर्वांना जोडणारा मूषकही यंदा आधुनिक रूपात — *Bappa's AI Assistant* म्हणून सजावटीचा भाग बनला. या संकल्पनेमागचा विचार साधा आहे: तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी त्याचा योग्य उपयोग करण्यासाठी मानवी बुद्धी, विवेक, मुल्ये आणि योग्य दिशा आवश्यक असते. AI आपल्याला मदत करू शकते; पण कोणत्या दिशेने जायचे, याचा विचारपूर्वक निर्णय घेणे आपल्याच हातात आहे

आमच्यासाठी ही सजावट म्हणजे केवळ मंदिर उभारणे नव्हते. ती होती अनेक पिढ्यांना जोडणारी परंपरा, मुलांना कृतीतून मिळणारे संस्कार, कुटुंबाने एकत्र केलेले श्रम आणि आधुनिक तंत्रज्ञानाकडे मूल्यांच्या नजरेतून पाहण्याचा एक छोटासा प्रयत्न.



परंपरेची मुळे घट्ट असावीत, आधुनिकतेचे पंख उंच असावेत आणि या दोन्हींना योग्य दिशा देणारा बाप्पांचा आशीर्वाद सदैव सोबत असावा!

गणपती बाप्पा मोरया!

-वृषसेन दखने आणि परिवार



भगवान गणेश

माझे नाव उर्वी दखने आहे. मी सध्या Winston Churchill Middle School मध्ये ८वीत शिकते. मी गेली २-३ वर्षे Digital Art करत आहे. Digital Art केल्यामुळे मला शांत आणि आनंदी वाटते. या वर्षी MMSAC गणपतीसाठी मी माझे हे चित्र एका Art Competition मध्ये पाठवले होते आणि मला दुसरा क्रमांक मिळाला. या चित्रात भगवान गणेश एका पानावर झोपले आहेत. हे पान पवित्र गंगा नदीवर तरंगत आहे. या चित्राचा मुख्य अर्थ असा आहे की, कठीण काळातसुद्धा आपल्याला शांतता मिळू शकते, जर आपण ती मनापासून शोधली तर. मला हे चित्र खूप आवडते, कारण यात सुंदर थंड रंग आणि भगवान गणेशांचे सुंदर दागिने आहेत.

-उर्वी वृषसेन दखने



गणपती बाप्पा मोरया!

समायरा ब्रीद ला गणपती बाप्पा आणि त्यांचा लाडका मूषक हे खूप आवडतात. MMSAC मध्ये तिने गणपतीची मूर्ती बनवण्याच्या वर्कशॉपमध्ये भाग घेतला होता. तिथूनच तिला अशी चित्रं काढायची प्रेरणा मिळाली.

यावर्षी मात्र दुसऱ्या एका ॲक्टिव्हिटीमुळे तिला वर्कशॉपला जाता आलं नाही. मूर्ती बनवता आली नाही, म्हणून ती थोडी हिरमुसलेली खरी... पण मग तिनेच एक शक्कल लढवली आणि यंदा आपल्या लाडक्या बाप्पांना कागदावरच रंगवलं आणि तयार झाले हे गोड गोड बाप्पा, सोबत त्यांचा छोटासा मूषकही!



बटर स्किशीची गोष्ट... हट्ट समायराचा, कमाल अंजलीची!

तर झालं असं की, माझ्या मुली, १३ वर्षांची **अंजली** आणि ८ वर्षांची **समायरा**, एकमेकींसोबत मस्त खेळत होत्या. खेळता खेळता समायराला नुकत्याच दुकानात पाहिलेल्या एका नवीन खेळण्याची आठवण झाली... तिला म्हणे एक नवीन बटर स्किशी टॉय हवं होतं! *आता समायराकडे आधीच इतकी स्किशी टॉईज आहेत की, त्यांचं स्वतंत्र दुकान उघडता येईल! त्यामुळे आईकडे नवीन स्किशीची* मागणी केली, तर उत्तर काय मिळणार, हे तिला चांगलंच माहीत होतं! पण समायरा काही सहज हार मानणाऱ्यांतली नाही! तिने लगेच आपला मोर्चा मोठ्या बहिणीकडे, म्हणजे अंजलीकडे वळवला. "ताई, तू मला एक बटर स्किशी बनवून देशील का?" आणि मग काय... मोठी बहीण मदतीला धावून आली!

तसंही अंजली म्हणजे रंग, कात्री, कागद घेऊन काहीतरी खुडबुड करण्याची संधी कधी मिळते, याची वाटच पाहत असते! त्यामुळे ही विनंती म्हणजे तिच्यासाठी पर्वणीच! मग अंजलीने एक A4 कागद, थोडे रंग, पारदर्शक चिकटपट्टी आणि भरपूर कल्पकता... एवढ्याच साहित्याच्या जोरावर चक्क बटरच्या पाकिटासारखं स्किशी टॉय तयार केलं! आणि तेही अगदी ४ औंस सॉल्टेड बटर! Et voilà! समायराचं नवीन बटर स्किशी तयार! समायरा खूश, अंजलीची कलाकुसर सफल आणि आईच्या पर्सला शून्य फटका! पण या सगळ्यातली सगळ्यात गोड गोष्ट म्हणजे, लहान बहिणीचा हट्ट पुरवण्यासाठी मोठ्या बहिणीने दाखवलेली कल्पकता आणि प्रेम!

थोडासा कागद, थोडेसे रंग, थोडी चिकटपट्टी... आणि भरपूर बहिणींचं प्रेम! कधी कधी बाजारातल्या महागड्या खेळण्यांपेक्षा घरच्या घरी बनवलेल्या अशा छोट्याशा गोष्टीच जास्त आनंद देऊन जातात!

आणि हो... आता घरात पुढची ऑर्डर कशाची येतेय, याचीच उत्सुकता आहे!

-सोनल ब्रीद



SERVICES & CAPABILITIES

DIGITAL FACTORY 24

AI Transformation & Digital Transformation Strategic Partner

Industry agnostic and technology agnostic. We bring the right technology, tools, and talent to each engagement.

60%	100%	50+	95%	210+	4+
YOY Growth	Client Retention	Trusted Partnerships	Repeat Business	Certified Professionals	Global Locations

Industry Agnostic. Technology Agnostic.

Digital Factory 24 (DF24) is an AI Transformation and Digital Transformation strategic partner supporting organizations across every stage of their technology journey — from cloud engineering and enterprise platforms (CRM, ERP, Salesforce) to AI/ML adoption, data engineering, and customer experience design. As an industry-agnostic and technology-agnostic company, DF24 is not tied to any single platform or vertical. Instead, we bring the right technology, tools, and talent to each engagement, guided by the client's business outcomes.

No vertical lock-in

We work across retail, healthcare, manufacturing, financial services, higher education, and the public sector.

No platform lock-in

Experience across the major cloud, commerce, CRM, ERP, DXP, and AI stacks. We recommend on fit, not affiliation.

Outcome guided

Each engagement is scoped against a business outcome, and the technology decision follows from it.

DF24 Landscape

14 practices. Each practice can be engaged on its own or as part of an end-to-end program.

01–04

Build

Web/Cloud Application Engineering

E-Commerce Solutions

Cloud, DevOps & Hosting

IoT Solutions

05–07

Enterprise Platforms

CRM Practice

Salesforce Practice

ERP Practice

08–11

Intelligence & Experience

AI Transformation & AI Enablement

UX / UI / CX / MX

Data & Analytics

Digital Marketing

12–14

Assure & Operate

Audit / Assessment

Quality Assurance & Testing

Managed Services & Support

निसर्गाच्या कुशीत, मैत्रीच्या सहवासात... पाइनक्रेस्ट कॅम्पिंगची अविस्मरणीय सफर!

वैशाली देवरे

"काही प्रवास अंतर कमी करतात, काही मनातील अंतर मिटवतात; तर काही प्रवास आयुष्यभर जपून ठेवाव्यात अशा आठवणींची शिदोरी देऊन जातात!"
धकाधकीचे जीवन, कामाच्या व्यापात अडकलेले दिवस, शाळा-ऑफिसची धावपळ आणि हातातून निसटणारा निवांतपणा... या सगळ्यांपासून काही काळ दूर जाऊन निसर्गाच्या सान्निध्यात रमण्याची संधी मिळाली, तर मनाला नवसंजीवनी मिळाल्याशिवाय राहत नाही. अशीच एक अविस्मरणीय संधी आम्हाला मिळाली, ती म्हणजे सॅक्रॅमेंटोहून कॅलिफोर्नियातील निसर्गरम्य *पाइनक्रेस्ट कॅम्पग्राउंड* येथे आयोजित केलेल्या मराठी मंडळाच्या सामूहिक कॅम्पिंगची! मराठी मंडळाच्या समूहात आम्ही तसे नवीनच. त्यात कॅम्पिंगचा अनुभवही पहिलाच! त्यामुळे मनात थोडीशी धाकधूकही होती. जंगलात तंबूत राहायचे, स्वतःच्या हाताने संसार थाटायचा आणि निसर्गाच्या कुशीत दोन दिवस घालवायचे, ही कल्पनाच रोमांचक होती. पण या प्रवासात निसर्गाइतकाच माणसांचा सहवासही मनाला समृद्ध करणार आहे, याची कल्पना आम्हाला तेव्हा नव्हती.

जंगलात उभे राहिले आपले छोटेसे विश्व!
शुक्रवारी संध्याकाळी एकेक गाडी पाइनक्रेस्टच्या दिशेने येऊ लागली आणि कॅम्पग्राउंडवर चैतन्याची चाहूल लागली. विस्तीर्ण परिसर,



उंचच उंच वृक्ष, सभोवताली पसरलेली हिरवाई आणि त्या निसर्गरम्य वातावरणात आपापली जागा शोधणारी कुटुंबे—सगळे दृश्य एखाद्या चित्रपटातील प्रसंगासारखे भासत होते.
कोणी तंबू उभारण्यात मग्न होते, तर कोणी दुसऱ्याच्या तंबूला हातभार लावत होते. कोणाची दोरी अडकली, कोणाचा खांब बसेना, तर कोणाला सूचना देणारे मदतनीस तयार! एकमेकांना मदत करताना अनोळखीपणाची भिंत कधी गळून पडली, ते कळलेच नाही. प्रत्येक तंबू म्हणजे जंगलात उभारलेला आपापला छोटासा राजवाडाच जणू! घरातील सुखसोयींची जागा मर्यादित साधनांनी घेतली होती; पण मनाचा मोकळेपणा मात्र अमर्याद होता.

मुलांचा आनंद तर ओसंडून वाहत होता. एवढे मोठे कॅम्पग्राउंड पाहून त्यांच्यासाठी जणू खेळण्याचे नवे विश्वच खुले झाले होते. लपाछपी, निरनिराळे खेळ आणि वॉकी-टॉकीवरून सुरू असलेले त्यांचे संदेश—कुणाला कुठे शोधायचे, कोण कुठे लपले आहे, याची

जणू जंगलात मोहीमच सुरू होती! त्यांच्या चेहऱ्यांवरचा आनंद पाहून जाणवत होते की, बालपणाला महागड्या खेळण्यांपेक्षा मोकळी जागा, मित्रांचा सहवास आणि थोडेसे साहस अधिक प्रिय असते.



हळूहळू आणखी कुटुंबे दाखल झाली. काही चेहरे परिचयाचे, तर काही अगदी नवीन. ओळख करून घेताना संभाषणाचा धागा कधी सामायिक शहराशी, कधी गावाशी, तर कधी कॉलेजच्या आठवणींशी जोडला जात होता. परदेशात राहताना आपल्या मातीशी जोडणारा एखादा समान धागा सापडला, की मनाला किती पटकन आपलेपणा वाटतो! नाव, गाव, शिक्षण आणि आठवणी यांच्या पुलावरून मैत्रीची पहिली पावले अलगद पडत होती.

चुलीचा सुगंध आणि मायेचा दरवळ!

एका बाजूला महिलांनी स्वयंपाकाची आघाडी सांभाळली होती. जंगलाच्या वातावरणात पिठलं-भाकरीसारखा अस्सल मराठमोळा बेत तयार होत होता. घरापासून दूर, निसर्गाच्या सान्निध्यात, मोकळ्या हवेत शिजणाऱ्या त्या पदार्थांचा सुगंध म्हणजे जणू महाराष्ट्राची आठवणच वाऱ्यावर स्वार होऊन आमच्यापर्यंत आली होती.



दुसरीकडे पुरुष मंडळी आणि मुले शेकोटीसाठी लाकडे गोळा करण्यात गुंतली होती. कामांची कोणतीही औपचारिक विभागणी नव्हती; प्रत्येकजण आपापल्या परीने हातभार लावत होता. काही वेळापूर्वी शांत असलेले कॅम्पग्राउंड आता रंगीबेरंगी तंबूंनी भरून गेले होते. सूर्य मावळतीला झुकला, आकाशात संधिप्रकाशाचे रंग पसरले आणि दिवसाची लगबग हळूहळू रात्रीच्या उत्सवात रूपांतरित होऊ लागली. सगळ्यांनी एकत्र बसून जेवणाचा आस्वाद घेतला. त्या जेवणाची चव केवळ पदार्थांमध्ये नव्हती; ती होती एकत्र कष्ट करण्याची, एकमेकांना मदत करण्याची आणि सहवासातून निर्माण झालेल्या आपुलकीची!

शेकोटीभोवती रंगलेली मैफल!

रात्र गडद होत गेली, आकाशात चांदण्या चमकू लागल्या आणि शेकोटीच्या ज्वाळांनी वातावरणात उबदारपणा पसरवला. दिवसभराच्या धावपळीनंतर सगळे शेकोटीभोवती जमले. लाकडांचा चटचट आवाज, आकाशातील तारकांची आरास आणि त्यात मिसळलेले हास्याचे फवारे—निसर्गानेच जणू आमच्या मैफलीसाठी सुंदर रंगमंच सजवला होता.



सुरुवात झाली गाण्यांनी. एक गाणे संपायच्या आत दुसऱ्याची फर्माइश, त्यानंतर ठेका धरायला लावणारे संगीत आणि मग नृत्याचा जल्लोष! नव्याने ओळख झालेली मंडळीही तालावर थिरकू लागली. जोडप्यांच्या नृत्यकौशल्याची झलक पाहताना तर हसून हसून पुरेवाट झाली. कोणाच्या हालचालींमध्ये कमालीचा आत्मविश्वास, कोणाच्या चेहऱ्यावर गोंधळ!

संपूर्ण दरी गाण्यांच्या सुरांनी आणि नृत्याच्या तालाने निनादत होती. त्या क्षणी वय, पद, व्यवसाय, ओळख या सगळ्या चौकटी मागे पडल्या होत्या. उरला होता तो फक्त आनंदाचा एक सामूहिक ठेका!

मोठी मुले लहानग्यांना खेळ शिकवत होती, त्यांच्यासोबत लपाछपी खेळत होती आणि रात्रीच्या अंधारात रंगणाऱ्या भुतांच्या गोष्टींनी त्यांच्या कल्पनाशक्तीला पंख देत होती. लहानग्यांच्या चेहऱ्यावर भीती आणि कुतूहल यांचे विलक्षण मिश्रण दिसत होते; तर गोष्ट सांगणाऱ्यांच्या चेहऱ्यावर खोडकर समाधान! त्या क्षणी प्रत्येक मूल प्रत्येकाचे होते आणि प्रत्येक मोठा माणूस त्यांच्या आनंदाचा सोबती होता. रात्र बरीच सरली होती. दिवसभराच्या उत्साहाने थकलेली शरीरे अखेर विसावली. तंबूच्या छताऐवजी डोळ्यांसमोर तारकांनी भरलेले आकाश, सभोवताली निसर्गाची शांतता आणि मनात आनंदाचा गोड गोंधळ घेऊन आम्ही झोपी गेलो.

सकाळचा ताजेपणा आणि निसर्गाशी मैत्री!

दुसऱ्या दिवशी सकाळी कॅम्पग्राउंड पुन्हा जागे झाले. काही जणांनी दिवसाची सुरुवात योगाभ्यास, स्ट्रेचिंग आणि हलक्या व्यायामाने केली. ताज्या हवेत घेतलेला प्रत्येक श्वास जणू शरीराला नवी ऊर्जा देत होता. निसर्गाच्या सान्निध्यात आरोग्य जपणाऱ्या काही ज्येष्ठ मंडळींचा उत्साह विशेष प्रेरणादायी होता. त्यांच्या उत्साही वृत्तीने एक गोष्ट शिकवली—वय हा आकड्यांचा विषय असू शकतो; पण जगण्याचा उत्साह हा मनाचा विषय आहे!



यानंतर गरमागरम पोहे आणि चहाचा बेत झाला. जंगलाच्या मध्यभागी, निसर्गाच्या साक्षीने घेतलेला तो साधासुधा नाश्ताही एखाद्या पंचतारांकित मेजवानीपेक्षा कमी वाटत नव्हता. घरात रोज सहज उपलब्ध असणाऱ्या गोष्टींचे खरे मोल घराबाहेर पडल्यावरच कळते. चहाचा प्रत्येक घोट आणि पोह्यांचा प्रत्येक घास त्या सकाळी काहीसा अधिकच रुचकर वाटत होता.

पाइनक्रेस्ट लेक : निसर्गाच्या कुशीतले साहस!



नाश्त्यानंतर आमचा मोर्चा वळला पाइनक्रेस्ट लेककडे. निळेशार पाणी, सभोवतालचे उंच वृक्ष, डोंगरांच्या कुशीत विसावलेले सरोवर आणि पाण्यावर पडणारे प्रकाशाचे प्रतिबिंब—निसर्गाने सौंदर्याची मुक्तहस्ते उधळण केली होती. पाँटून बोटिंगचा अनुभव तर विशेषच! बोटीतून सरोवराची सफर करताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. बोट चालवण्याचा अनुभव घेण्याची संधीही अनेकांना मिळाली. पाण्याच्या शांत पृष्ठभागावरून पुढे सरकताना सभोवतालच्या निसर्गाचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत होते.

यानंतर पाइनक्रेस्ट ट्रेलवरील ट्रेकिंगची वेळ आली. तरुण मुले-मुली, मध्यमवयीन मंडळी आणि ज्येष्ठ अशा विविध वयोगटांतील लोकांनी आपापल्या क्षमतेनुसार या साहसी उपक्रमात सहभाग घेतला.

झाडांमधून डोकावणारा सूर्यप्रकाश, पायाखाली जाणवणारी माती, थंडगार वारा आणि वाटेत रंगणाऱ्या गप्पा—या सगळ्यांनी ट्रेकिंगचा थकवाही आनंदाचा भाग बनवला. कधी एखाद्याची गती मंदावली, तर सोबतीने चालणारे थांबत होते. कधी एखाद्याला मदतीची गरज भासली, तर हात पुढे येत होता.

दुसरी संध्याकाळ : आठवणी, खेळ आणि सुरांची बरसात!

ट्रेकिंगनंतर सगळे कॅम्पग्राउंडवर परतले. दिवसभराच्या साहसानंतर आता पोटपूजेची वेळ होती. विविध पदार्थांनी सजलेला सामूहिक जेवणाचा बेत पाहून पुन्हा एकदा मराठी खाद्यसंस्कृतीची श्रीमंती जाणवली. प्रत्येक पदार्थामागे कोणाचा तरी वेळ, मेहनत आणि प्रेम दडलेले होते. संध्याकाळ झाली आणि पुन्हा एकदा शेकोटीभोवती मैफल जमली. यावेळी सुरुवात झाली स्वरसम्राज्ञी, दिवंगत आशा भोसले यांच्या अजरामर गाण्यांच्या आठवणींनी. त्यांच्या सुरांनी अनेक पिढ्यांच्या मनावर राज्य केले आहे.यानंतर सुरू झाली सांघिक खेळांची धमाल! आणि या खेळांनी तर मैत्रीच्या नात्यांना आणखी रंगत आणली. पती-पत्नींच्या जोड्या आपापल्या संघांमध्ये विभागल्या गेल्यावर एक वेगळेच चित्र पाहायला मिळाले. घरी एकाच छताखाली राहणारी जोडपी खेळाच्या मैदानात मात्र जणू एकमेकांची कट्टर प्रतिस्पर्धी बनली होती! घरात रोज एकमेकांना साथ देणारे नवरा-बायको संघाच्या विजयासाठी मात्र जीवाचे रान करत होते. खेळातील डावपेच, एकमेकांना दिलेली आव्हाने आणि प्रतिस्पर्ध्याला



हरवण्याची धडपड पाहून हसता हसता पोट दुखायची वेळ आली. रात्रीची सांगता झाली गीतांनी, कवितांनी आणि गोष्टींनी. शेकोटीच्या मंद प्रकाशात कविता ऐकताना शब्दांना जणू नवे आयुष्य लाभत होते.

पडदा पडला, पण आठवणींचा खेळ सुरूच!

तिसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा एकदा चविष्ट उपम्याचा नाश्ता झाला. त्यानंतर हळूहळू तंबू उतरवण्याची, सामान आवरण्याची आणि परतीच्या प्रवासाची तयारी सुरू झाली. काही जणांनी घोडेस्वारीचा आनंद घेतला, तर काही जण उरलेल्या क्षणांना मनात साठवून घेत होते. दोन दिवसांपूर्वी ज्या जागी तंबू उभारले होते, तिथे आता पुन्हा मोकळे मैदान दिसू लागले. हळूहळू गाड्या निघू लागल्या, निरोपांचे हात हलू लागले आणि कॅम्पग्राउंड शांत होऊ लागले. मात्र, त्या जागी घालवलेल्या क्षणांचा गोंगाट मनात अजूनही सुरूच होता.
सॅक्रॅमेंटोला परतल्यावर पुन्हा तेच रोजचे आयुष्य सुरू झाले. कामाच्या वेळा, शाळेची लगबग, घरातील जबाबदाऱ्या आणि नेहमीची दिनचर्या. पण या सगळ्यांच्या मध्ये मनाचा एक कोपरा अजूनही पाइनक्रेस्टच्या जंगलातच रेंगाळत होता. फोनवरील संदेश, कॅम्पिंगमधील छायाचित्रे आणि एकमेकांशी शेअर केलेले अनुभव यांतून त्या दिवसांची उजळणी सुरू होती.
खरं सांगायचं तर, लग्नानंतर माहेरची माणसे भेटून, गप्पा मारून, आनंदाचे क्षण घालवून परतताना जशी एक हुरहूर मनात दाटते, तशीच काहीशी भावना या कॅम्पिंगनंतर मनात निर्माण झाली. दोन दिवसांपूर्वी अनोळखी असलेली काही माणसे आता आपली वाटू लागली होती. त्यांच्या हसण्याची, बोलण्याची, एकत्र खेळण्याची आणि शेकोटीभोवती रंगलेल्या मैफलीची सवय झाली होती. निरोप घेताना जाणवले की, आपण केवळ कॅम्पिंग करून परतत नाही आहोत; आपण नव्या मैत्रीची, आपुलकीची आणि नात्यांची शिदोरी घेऊन घरी परतत आहोत.

कॅम्पिंगने दिलेली जीवनाची शिदोरी!

या अनुभवाने आम्हाला अनेक गोष्टी शिकवल्या. आनंदासाठी नेहमी महागड्या ठिकाणांची किंवा आलिशान सोयींची आवश्यकता नसते. कधी एक तंबू, शेकोटीभोवती जमलेली माणसे, घरगुती जेवण आणि मनमोकळ्या गप्पा एवढेच पुरेसे असते.
आजच्या डिजिटल युगात आपण अनेकदा स्क्रीनच्या जगात इतके गुंतून जातो, की समोर बसलेल्या माणसाशी मनमोकळे बोलायलाही वेळ उरत नाही. या कॅम्पिंगने जणू डिजिटल डिटॉक्सच घडवला. मोबाईलच्या पडद्याऐवजी डोळ्यांसमोर निसर्ग होता; आभासी संवादाऐवजी प्रत्यक्ष गप्पा होत्या; ऑनलाइन मनोरंजनाऐवजी एकत्र गायलेली गाणी, खेळलेले खेळ आणि मनापासून उमटलेले हास्य होते. तंत्रज्ञानाच्या जगातून काही काळ बाहेर पडल्यावर नात्यांच्या जगात किती सुंदर रंग भरता येतात, याची जाणीव झाली.
आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, मराठी माणसाच्या स्वभावातील एक खास गुण पुन्हा अनुभवायला मिळाला—**मराठी माणूस दुसऱ्या मराठी माणसाला भेटला की, तो कितीही अनोळखी असला तरी त्याला आपलेसे करायला फार वेळ लागत नाही!** एखाद्या गावाचा उल्लेख, कॉलेजची एखादी आठवण, मराठी पदार्थांचा सुगंध किंवा एखादे ओळखीचे गाणे—एवढ्याशा धाग्यानेही आपुलकीचे घट्ट नाते विणले जाते. परदेशात राहूनही आपल्या संस्कृतीचे, भाषेचे आणि माणुसकीचे हे बंध जपले जातात, हीच खरी आनंदाची बाब आहे.

पुढच्या कॅम्पिंगची आतुरता!

पाइनक्रेस्टचा हा प्रवास संपला असला, तरी त्याने दिलेला आनंद संपलेला नाही. तंबू आवरले, सामान जागेवर ठेवले, गाड्या गॅरेजमध्ये उभ्या राहिल्या आणि पुन्हा दिनचर्येचे चक्र सुरू झाले; पण मनाच्या कोपऱ्यात एक सुंदर कॅम्पग्राउंड कायमचे वसले आहे.
आता प्रतीक्षा आहे पुढच्या वर्षीच्या कॅम्पिंगची—पुन्हा त्याच उत्साहाने भेटण्याची, नव्या आठवणी निर्माण करण्याची, जुन्या आठवणींना उजाळा देण्याची आणि मैत्रीच्या या सुंदर परिवारात आणखी काही नाती जोडण्याची!

-वैशाली देवरे





आशिष पुजारी यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांच्या साहाय्याने साकारलेली चित्रे

कवितेच्या दालनात

विचार

वेळ काढायचाच म्हंटलं की येतो न काढता
मनात मुद्यांचे भुंगे सुद्धा घालतात की पिंगा

पण लिहायला बसलं तर काहीच पुढे सुचत नाही
कुठल्याच मुद्याची धार बोटांतून झरत नाही..

सोशल मिडियावर डोकावलं की, वेगळंच चित्र असतं
तिथं मात्र प्रतिभेचं तेज भिंती-भिंतीवर दिसतं.

पाऊस म्हंटल की पाऊस पाऊस हौसे हौसेनं बरसतो
आषाढी-कार्तिकीला विठू शब्दा शब्दात मिसळतो

भणाणते उन, कललेली संध्याकाळ
कधी हा दिवस, कधी तशी सकाळ
कधी उदास भावना, कधी वेळ कातर
प्रेम-बिम तर असतंच ना बनून शब्दसाखर!

विरहाचं दु:ख, मातीची माया,
आभाळाची उंची, कधी कदंबाची छाया..
फुलांचा गंध, मोहाची वाट
होळीची पोळी अन् दिवाळी पहाट!

अगणित विषय आणि असं व्यक्त होणं
भिंतींवरून काढून नजर, परत मनात डोकावणं...

सगळं हे-ते वाचून कसं तुडुंब भरलेलं असतं मन
मुद्दे, बोच, दुखऱ्या नसा - विसरूनच जातं काही क्षण

वाटतं सगळ्यांनी सगळंच केलं आहे व्यक्त
माझ्या मनातला विचार काय तो- माझ्यासाठीच फक्त!

असं वाटताच काय करावं?
आपल्या विचाराचं बोट धरून
थोडं शांत बसावं..
त्याला भावनेच्या उबेत जोजवावं
त्याचं म्हणणं नक्की काय
ते जरा समजून घ्यावं.

कळतं मग आपल्याला -
त्याचंही आहे एक आकाश
स्वच्छंदपणे विहरण्यासाठी
"**अभिरूचीच्या**" पानावर
शब्दं होऊन सजण्यासाठी!

जाणवता हे, विचार खुदकन हसतो
आपणही पटकन लिहायला बसतो.

~प्रीती देशपांडे

दिवाळीचा प्रवास

वर्षातले दिवस, दिवसातले तास,
सगळेच काही नसतात आनंदी अन खास
पण अशातच एकदा येते दिवाळी,
जी आणते उत्साह आणि मजा निराळी

लहानपणी असते लगबग न्यारी,
सुट्टी, फराळ, फटाक्यांची किमया सारी
मित्रांना जमवून बांधायचा किल्ला,
जरा जपून, असा आई-बाबांचा सल्ला

तरुणाईत भरलेले प्रेमाचे वारे,
मनात फुलबाज्या आणि कवेत चांद-तारे
आयुष्य वाटते एक झगमगती वाट,
अशात काही औरच असतो दिवाळीचा थाट

चाळीशीला होते दिवाळी स्थिर, संयमी
कुटुंबाच्या आनंदात, खुशी असते नामी
दिवाळीच्या दिव्यासोबत, थोडा स्वत:चा प्रकाश,
हक्काची जमीन पायाखाली, अन एक तुकडा आकाश !!

बघता-बघता आयुष्याचा संपत येतो प्रवास,
उणे-अधिकच्या पल्याड जातो कुडीमधला श्वास
काळोख येतो दाटून आयुष्याच्या संध्याकाळी,
परंतु उजळत रहाते मनात आठवणींची दिवाळी !!

~प्रीती देशपांडे



माझी अमेरिका वारी

लहानपणी ऐकले होते,
साता समुद्र पलीकडे आहे एक प्रदेश
संपन्न, विकसित, उन्नत, जगात एक नंबर असा हा देश.

ना प्राचीन संस्कृती, ना प्राचीन इतिहास.
नाव अमेरिका, जगात स्थान आहे मात्र खास!

अनेक धर्म आणि संस्कृती नांदतात येथे एकत्र,
हातात यांच्या आहे साऱ्या जगाचे सूत्र!

या देशाला भेट देण्याचा कधीच नव्हता उद्देश,
पण योग आला जुळूनी, कन्या जावयांचे आले निर्देश!

प्रवास करूनी खडतर,जोडीने पोहोचलो इथवर,
नातवंडांना भेटून मात्र झाला श्रमपरिहार!

पाहून येथील गगनचुंबी इमारती आणि सुबक घरे,
उंच पर्वत आणि हिरवा निसर्ग, मन झाले प्रसन्न सारे.

मिळाले येथे आदरातिथ्य, आपुलकी आणि मान,
कृतज्ञ आहोत मराठी मंडळाचे, केला त्यांनी सन्मान!

मनात कायम रेंगाळतील आपणा सर्वांच्या आठवणी,
असाच स्नेह कायम ठेवुनी, करा आमुची पाठवणी.

~श्रीपाल ललवाणी



अमेरिकेतल्या घराची हसरी ओळख

लिव्हिन्ग रूम मधे सोफा आणि दिवाण,
रंगीत कार्पेट त्यांची बहीण लहान
अति लाजाळू ती, शोषून घेते सर्व घाण,
व्हॅक्यूम क्लिनरच्या साबणाने करते स्नान

स्वयंपाक घरात असतो मोठा फ्रिज,
आत दही, दूध, बटर आणि चीज
अन्न, फळे, भाजीपाला कोंबला सहज,
तर होते आठ दहा दिवसांची तजवीज

शेजारीच असे छोटी लौंड्री रूम
वॉशर ड्रायर शुभ्र पांढरे, शोभती ब्राईड अन ग्रूम
दोघांचे असे एकमेकांवर अति प्रेम
खेळतात कपडे धुणे आणि वाळवण्याचा गेम

एक मोठी बेडरूम, म्हणती तिला मास्टर
तेथे विसावती एक मिसेस आणि मिस्टर
समोरच्या भिंतीवर असे एक सुंदर पोस्टर
टेबलावर छान टीव्ही अँटेना बुस्टर

टॉयलेट, बेसिन, टब साठी असे बाथरूम
आत शिरताच पंखा लाईट करिती सलाम
स्नानासाठी पाणी मिळे गरमागरम
मात्र आरशावर वाफ येऊन फुटे त्यास घाम

छोटा रिमोट उघडे गॅरेजचे महाद्वार
स्पर्श टाळायला कडक सोवळे पाळतो सेन्सर
आत आहेत व्हॅनआणि कार हे वधू वर
यजमानांची सेवा कराया अति तत्पर

खाली असते बेसमेंट, एक प्रचंड तळघर
अनेक कॉलम इथे जशा घडा डोईवर
ताल धरुनी नाद देती कोपऱ्यातून बॉयलर हीटर
बॅगा, खोके, डबे ह्या प्रेक्षकांची गर्दी सभोवर

~प्रभाकर मालपुरे



पांडुरंगा

तुझे रूप घेवून चित्ती, तुझ्या दारी आलो
पंढरीत येऊन देवा पांडुरंग झालो.
देह देव झाला माझा, शब्द ब्रम्ह झाले
मनातील साऱ्या शंका भागीरथी न्हाले.
भक्तीतल्या सुरसंगे मीच सूर झालो.

टाळ मृदूंगाच्या नादी देहभान गेले
मी न राहिलो माझा पूर्ण दंग झालो.

कृष्णवर्ण बघता बघता प्रकाशलो चित्ती
कृष्णरुप होता सरली मनातली भीती
शब्दशब्द येता जुळुनी मी अभंग झालो.

पूर्णपणे शिरुनि माझ्या अंतरात देवा
रोवलंस अंतर्यामी भक्तीचाच ठेवा
मी न वेगळा तू आता एकरूप झालो.

सर्व पहिले मी अंती सौख्य कुठे नाही
दान धर्म करुनी झाले, फिरुनी दिशा दाही
म्हणुनी तूच माझा ठेवा, तुझ्या दारी आलो.

क्षणोक्षणी चित्ती वाचा पांडुरंग यावा
नेत्र तुला बघता बघता, देह प्राण जावा
नको मनी शंका कसली, मी निशंक झालो.



~मुरलीधर अडेट्टीवार



तूही तेरा ईश है

हँसाने से अगर दुख मिटते,
तो जोकर के घर आँसू ना बहेते

सिर्फ चलने से मंजील मिलती,
तो कितने अब तक उस पार पहुँचते

सिर्फ सोचने से अगर कुछ पाता,
तो हम कबके अमीर और पंडित होते

ऐ इन्सान,
जीवन सिर्फ चंद साँसो का प्रवास नही,
साँस तो चुहे बिल्ली भी लेते है

मनुष्य हो, लहेरोंकी गहराईंको देख,
मानव हो, हास्य के पिछेका मन देख

चाँद नहीं, उसे प्रकाशित कौन करता वो देख,
ईश्वर को धुंड मत, क्योंकी नही मिलेगा तुझे

तुझेही क्यों, किसीको मिला नही वो अबतक,
बेचारे जपजाप करते हैं भगवान को पाने के लिये

कैसे मिलेगा बाहर, जो तेरे अंदर छुपा है
मानव से प्यार कर, अरे तू ही तेरा ईश है!

~अजित नातू



त्याला काय म्हणतात

नदीच्या पाण्याचा प्रवाह जिथून सुरु होतो
त्याला मूळ म्हणतात
जिथून अश्रूंची सुरुवात होते त्याला,
डोळे नव्हे, काळीज म्हणतात.

जिथून आठवणींची लाट उसळते, कोसळते,
त्याला मन म्हणतात
जिथून वात्सल्याची सुरुवात होते (अन् शेवटही),
त्याला आई म्हणतात.

जिथून खऱ्या सुखाची सुरुवात होते,
त्याला पैलतीर म्हणतात,
जे प्यावेसे वाटते, पण जे नसतेच,
त्याला मृगजळ म्हणतात.

जे हाताशी आले वाटते पण जे दूरच रहाते,
त्याला क्षितीज म्हणतात
जिथून निष्पापतेची सुरुवात अन् शेवटही होतो,
त्याला बालपण म्हणतात.

अटळ असलेला शेवट टाळण्यासाठी जी धडपड असते,
त्याला जीवन म्हणतात
सुंदर, महान, अवर्णनीय असली तरी अनाकलनीय गुढ असते,
त्याला स्त्री म्हणतात.

बुद्धीचे सामर्थ्य, अंतरीची स्वप्ने कर्तव्यातून साकार करतात,
त्याला हात म्हणतात
अनपेक्षित, पण उत्साहाचे धाडशी निर्णय वा वागणे,
याला १५-१६ चे तारुण्य म्हणतात.

मुलगा योग्य नाही तरी प्रेयसी जीवन ओवाळून टाकते,
याला वेडे प्रेम म्हणतात
मुलगा कितीही वाईट वागला, तरी आईचे हृदय आसुसते,
त्याला वात्सल्य म्हणतात.

कोठलीही परिस्थिति असो, संतुलित वागणे, बोलणे, विचार करणे,
याला स्थितप्रज्ञ म्हणतात
काहीही चुका नसल्या केल्या, सन्मार्ग केला तरी जीवघेणे दुःख येणे,
याला प्राक्तन म्हणतात.

~अजित नातू

धाड

सांगुनी पापणीला, का अशी बेईमान झाली?
वेदना तर हृदयात होती,
का पापणीला ओल आली?

साठवल्या हृदयात जखमा
त्याही अशा का फितूर झाल्या?
तोडून हृदयाची कवाडे,
का अशा ओठात आल्या?

मी कधी वेदनांचा बाजार नव्हता मांडला
टाकली ही धाड कोणी?
साठा कसा उघड झाला?
साठा कसा उघड झाला?

~पांडुरंग भोसले



बंधने बांधली कुणी, आयुष्ये सांधली कुणी
धागा जो जुळला मनी, जपतो जन्मांतूनी!

प्रीती देशपांडे

गेल्या दशकात मानसशास्त्रा बाबत जनसामान्यांमधे एकंदरीतच जागरूकता वाढलेली दिसते. "थेरपी" हा तर अगदी परवलीचा शब्द झालाय. पूर्वी "त्याचा स्वभावच विचित्र आहे" किंवा "ती जरा तापटच आहे", "तो फारच घुमा आहे" अशा बिरुदांमागे मूळ प्रॉब्लेम दुर्लक्षित केला जायचा. असाच वारंवार कानावर पडणारा दुसरा शब्दं - चाईल्डहुड ट्रॉमा (बालपणी अनुभवलेले मानसिक आघात). Wait a minute.. Out of track जात नाहीये मी. आपण अंकाच्या विषयाकडेच वळतोय..

मी सांगत असं होते की बालपणी अनुभवलेले मानसिक आघात जसे खोलवर परिणाम करतात, तसंच बालपणीचे चांगले अनुभव आयुष्यभर आनंद आणि उर्मी पण देतात. ते अगदी short lived असले तरी त्यांचा सकारात्मक संदर्भ आयुष्यभर साथ करत राहतो. काही माणसं जन्मापासून आपल्या सोबत असतात, तर काही वाटेत भेटतात आणि नकळत आपल्या मनात कायमचं घर करतात. त्यांच्या सहवासातले क्षण आठवले की आजही चेहऱ्यावर हसू उमटतं, आणि कधीकधी डोळ्यांत पाणीही तरळतं. त्या पाण्यात आठवणींची ओल असते, प्रेमाची ऊब असते आणि अशी माणसं आपल्या आयुष्यात आली, याबद्दलची कृतज्ञताही असते.

दरवर्षी रक्षाबंधन आणि भाऊबीज आली की माझ्या मनात अशाच आठवणींचा उत्सव सुरू होतो!

ज्या काळात घराघरांत दोन-तीन मुलं असणं अगदी स्वाभाविक मानलं जायचं, त्या काळात माझ्या पुरोगामी आई-बाबांनी एका मुलीवर थांबायचा निर्णय घेतला. या एका विषयावर त्यांचं अगदी मनापासून एकमत झालं असावं, असा माझा आजही प्रांजळ समज आहे! त्यामुळे "तू काय बाई, एकुलती एक!" ही माझी ओळख तेंव्हा आजच्या एखाद्या हॅशटॅगसारखी कायम झळकत राहिली. परंतु हे सण-वार आले की कळत-नकळत माझं मन खट्टू व्हायचं. रोज सोबत खेळणारं, भांडणारं, खोड्या काढणारं, गुपितं जपणारं एखादं भावंड आपल्या घरीही असावं असं वाटायचं. मित्र मैत्रिणींच्या रक्षाबंधन आणि भाऊबीजेच्या गमती, गप्पा ऐकून तर ती इच्छा अजूनच तीव्र व्हायची. परंतु आई-बाबांशी हा विषय बोलण्याची त्या काळी पद्धत नव्हती म्हणा किंवा आमची हिम्मत पण नव्हती. आजच्या काळात ज्याला "मॅनिफेस्टेशन" म्हणतात तसंच काहीसं झालं असणार बहुदा. माझी ही तीव्र इच्छा मी चौथीत असताना अगदी आश्चर्यकारक पद्धतीनं पूर्ण झाली.

"त्यांच्याशी", म्हणजेच कुळकर्णी कुटुंबाशी आमची ओळख झाली. स्कॉलरशिपची फी भरायला शाळेत आलेल्या कुळकर्णी काकू आणि माझ्या आईची ओळख झाली. त्यांना तीन मुलगे होते, मुलगी नव्हती. सगळ्यात धाकटा माझ्याच वयाचा. ओळखीचं मैत्रीत आणि मैत्रीचं घरच्या नात्यात रूपांतर कधी झालं, कळलंच नाही. मुलींची खूप आवड असलेल्या काकूंनी मला आपली मुलगी मानलं, आणि मला एक नव्हे तर एकदम तीन भाऊ मिळाले! माझ्या छोट्याशा जगात एका जणू मंत्रमुग्ध करणाऱ्या पर्वाचा प्रवेश झाला. सगळ्यांची मन अशी जुळली की as if it was meant to happen!

आता सण एकत्र साजरे होऊ लागले. रोजच्या आयुष्यातही नवी मजा आली. माझी काळजी घेणारे, लाड करणारे, मला काय हवंय हे आवर्जून पाहणारे तीन भाऊ माझ्या सोबत होते. माझ्या आवडीचा पदार्थ असला की स्वतःच्या वाट्यातून माझ्यासाठी बाजूला ठेवणं, माझ्या छोट्यामोठ्या गोष्टींकडे लक्ष देणं..त्यांच्या या साध्या कृतींमधून किती मोठं प्रेम मिळत होतं! एकेकाळी भावंडाची सोबत हवी होती; आता तीन भावांच्या प्रेमानं माझं आयुष्य भरून गेलं होतं. मनातलं एक वर्तुळ अलगद पूर्ण झालं.

वय वाढत गेलं तशी आमची मैत्री आणि आपुलकीही बहरत गेली. शब्दांशिवाय एकमेकांना समजून घेता येऊ लागलं. आमच्या मित्रमैत्रिणींमधेही आमचं बहीण-भावांचं नातं रूढ झालं. रक्ताचं नातं नसूनही आमच्या चौघांचं एक अगदी आपलं विश्व तयार झालं. रक्षाबंधनाला त्यांच्या इतर बहिणींच्या राख्या यायच्या; पण मी ओवाळून राखी बांधल्याशिवाय बाकीच्या राख्या बांधून घ्यायच्या नाहीत, हा त्यांचा प्रेमळ नियम होता. माझ्यासाठी हा किती मोठा मान होता! पाठोपाठची तीन मुलं एका घरात म्हणजे भांडणांची रेलचेल होतीच! त्या भांडणांत मात्र माझी भूमिका फार महत्त्वाची असायची. काका-काकूंना सोडवताना दमछाक झालेली भांडणं माझे भरून

आलेले डोळे पाहीले की अगदी झटक्यात मिटायची. आज आठवलं की हसू येतं. वेळी भावंडांवर अधिकार गाजवण्यात जे सुख असतं त्याचाही अनुभव मला येत होता. या नात्याची गोडीच वेगळी होती. त्या वयात या भावभावनांचं विश्व दररोज समृद्ध आणि प्रगल्भ होत होतं.

सातवी संपली आणि काकांची दुसऱ्या गावी बदली झाली. सरकारी नोकरीत बदल्या होत असतात, हे समजत होतं; पण मनाला आमचा रोजचा सहवास सोडायचा नव्हता. काही गोष्टी आपल्या आवाका बाहेरच्या असतात तेच खरं. निरोपाची ती संध्याकाळ आजही स्पष्ट आठवते. एस.टी. स्टँडवर उभी असलेली लाल गाडी, टपावर चढवलेलं सामान, खिडकीत बसलेले माझे भाऊ आणि खाली उभी असलेली मी. फारसं बोलणं होत नव्हतं. आळीपाळीन त्यांचे हात हातात घेत होते. गाडी सुरू झाली तशी तिच्यासोबत पुढे चालत राहिले. गाडीन वेग घेतला आणि हात सुटले... त्या क्षणी निरोप कठीण होता. पण पुढच्या काळात उमगलं; हात सुटले तरी मनातली वीण कायम होती. "हाथ छुटे भी तो रिश्ते नहीं छोडा करते"!

आम्ही ठरवल्याप्रमाणे पत्रं लिहीत राहिलो. त्या पत्रांत शाळा होती, मित्र होते, छोट्या गंमती होत्या आणि एकमेकांच्या आयुष्यात सहभागी राहण्याचा आनंद होता. पोस्टाने राखी जाऊ लागली. माझी राखी काकूंकडून बांधून घेतल्यावरच बाकीच्या राख्या हातावर चढायच्या. अंतर वाढलं होतं; आमच्या प्रेमळ परंपरेनं मात्र आपली जागा जपली होती. चार वर्षांनी, माझी अकरावीची परीक्षा झाल्यावर, पुन्हा भेटीचा योग आला. आता आम्ही सगळे मोठे झालो होतो. सुरुवातीला थोडी संकोचाची, थोडी उत्सुकतेची भावना होती. पण काही क्षणांतच जुनं हसू, जुन्या गप्पा आणि आपलेपणाचा तोच सहजपणा परत आला. जणू कालच भेटलो होतो! त्या भेटीनं एक विश्वास दिला - मनाच्या नात्याला अंतर ओलांडता येतं. कॉलेजच्या दुसऱ्या वर्षी माझं लग्न ठरलं. आयुष्याने नवं वळण घेतलं. या "मानलेल्या" भावांचं माझ्या आयुष्यातलं स्थान सासरच्या माणसांना समजेल का, अशी थोडी धाकधूक होती. पण त्यांनीही हे नातं आपुलकीने स्वीकारलं आणि मन निवांत झालं. आपल्या प्रिय माणसांना आपल्या नव्या जगातही जागा मिळणं, हा किती सुंदर आनंद असतो!

लग्नानंतर काही काळातच अगदी ध्यानीमनी नसताना माझ्या लाडक्या काकू देवाघरी गेल्या. त्यांचं जाणं आमच्या सगळ्यांच्या काळजाला चटका लावून गेलं. आयुष्यात मोठी पोकळी निर्माण झाली. मला मुलगी म्हणून जवळ घेणाऱ्या आणि आम्हा चौघांना एकत्र आणणाऱ्या मायेची उब हरवली. पण त्यांनी दिलेलं प्रेम आमच्याबरोबर राहिलं ते कायमचं!

पुढे आम्ही आपापल्या संसारात रमलो. जबाबदाऱ्या वाढल्या. मी अमेरिकेत आले आणि भौगोलिक अंतर आणखी वाढलं. पूर्वीसारखं सतत बोलणं शक्य होईनासं झालं; जमेल तशी पत्रांची देवाणघेवाण होत राहिली. आमच्या आयुष्यांचा वेग बदलला, आम्हीही बदललो. संवाद कमी होत गेला. वय वाढत गेलं तसं जनमानसात असलेल्या "मानलेली" बहीण या नात्याच्या चौकटीची मर्यादा लक्षात आली आणि आज काकू हव्या होत्या असं प्रकर्षानं वाटायला लागलं. त्या असत्या तर या मर्यादा कधीच ठळक झाल्या नसत्या याची मला मनोमन खात्री आहे.

माझ्या या तीन भावांनी माझं बालपण समृद्ध केलं. भावंडांच्या सहवासाची मजा दिली. प्रेमानं जोडलेलं नातं किती आपलं, परिपूर्ण असू होऊ शकतं, याची अनुभूती दिली. त्याबद्दल आजही माझ्या मनात खूप कृतज्ञता आहे आणि कायम राहील.

आता रक्षाबंधन किंवा भाऊबीज आली की त्या लहानपणीच्या आठवणींसोबत सोहळे साजरे होतात. प्रत्यक्ष भेटींची गरज खरंच भासत नाही. मन समाधानी आणि प्रसन्न होत प्रत्येक रक्षाबंधन आणि भाऊबीजेला म्हणत राहतं..

भावा-बहिणीचा सण, भरे आनंदानं मन, काठोकाठ !
माझ्या भावांस लाभावे शतायुषी दान, सुख समाधान, राहो सदा !!

-प्रीती देशपांडे



वा गुरु!!!

संदीप बिडये

स्मिताताईंनी अभिरुचीसाठी "जुलै ते नोव्हेंबर मध्ये साजरे केले जाणारे सण" असा विषय घेऊन आवाहन केले. मी उत्सुकतेपोटी कालनिर्णय बघितले आणि दहीहंडी, रक्षाबंधन, गणेशोत्सव, नवरात्री , दिवाळी ह्या सेलिब्रेटी सणांच्या गर्दीत एका सणाने माझे लक्ष वेधले. तो सण म्हणजे जुलै महिन्यात साजरा होणारा "गुरुपौर्णिमा". तेव्हा विचार केला ह्याच विषयावर थोडे लिहू, आणि वाचकांना मी माझा गुरु मानत असल्याने ते ह्याही लिखाणाचा स्वीकार करतील किंवा गुरुदक्षिणेत माझी सर्वच बोटे मागतील जेणेकरून असे लिखाण परत होणार नाही !

कला, क्रीडा क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तींना व्यवस्थित गुरु लाभलेले असतात आणि ते नक्कीच ह्या दिवशी आपल्या गुरूंचे आभार मानून गुरु पौर्णिमा साजरी करत असतील. परंतु, आमच्या सारख्या सामान्य कुवतीच्या पामरांना असे भाग्य क्वचितच मिळते. आम्ही आपले कधीतरी "भेटला विठ्ठल" असा क्षण येईल याची वाट बघत थांबतो. खरंतर, ह्या सणाच्या दिवशी सोशल मीडियावर भरपूर मेसेज फिरतात. बरेचसे मेसेज एकतर विनोदी ढंगाचे असतात, जसे की "रोज नवनवीन ज्ञान देणाऱ्या बायकोला, नाहीतर वाईट सवयी लावणाऱ्या माझ्या मित्राला आणि काहीच नाही तर आजकाल व्हाट्सअँपला गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा वगैरे वगैरे". ह्या व्यतिरिक्त काही मेसेज थोडेसे गंभीर असतात आणि त्यातल्याच एका मेसेजने मला गुरु पौर्णिमा साजरी करायची कल्पना दिली. तो मेसेज साधारण असा होता "आयुष्यातील अनुभव, समाजातील मार्गदर्शक आणि आपल्याला योग्य दिशा दाखवणारे सर्वच "गुरु" ह्यांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा".

मग विचार केला की दरवर्षी छान शिकवण देणाऱ्या एका प्रसंगाची आठवण करून, त्या गुरूंचे आभार मानूनच गुरुपौर्णिमा साजरी करायची. तोच प्रसंग इथे लिहीत आहे.

ते क्षण वरकरणी खोडकर वाटत असले तरीही त्यामागे आमच्या मित्ररूपी गुरूंचे मोठे ज्ञान लपलेले आहे.

तर, साधारण एक वर्षांपूर्वी अशा गुरूंचा प्रत्यय देणारी एक घटना घडली होती. आम्ही काही मित्र कोकणात एका मित्राच्या घरी एकत्र भेटलो होतो. घराच्या जवळच सुंदर आणि छोटासा धबधबा होता. तेव्हा सर्वजण दुपारी जेवायच्या आधी मस्त धबधब्याखाली भिजायला गेलो होतो. मस्त मज्जा मस्ती चालू होती आणि तेवढ्यात तो (भेटला विठ्ठल) क्षण आला. सर्वप्रथम मित्ररूपी गुरु-१ ह्यांनी एका (नशीबवान) मित्ररूपी शिष्याची एक चप्पल शोधली आणि धबधब्याच्या प्रवाहात फेकून दिली. आता चप्पल मालकाला प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला जावे लागले आणि मोठ्या कष्टाने त्याने ती चप्पल परत आणली. तुम्ही म्हणाल ह्यात काय मोठे, अशी मस्ती तर आम्ही पण करतो.. बरोबर आहे तुमचे, चप्पल फेकली ते महत्वाचे नाही तर त्यामागची शिकवण महत्वाची आहे. **गुरूंना हेच सांगायचे होते की आयुष्यात प्रवाहाच्या विरुद्ध जाणे किती कठीण असते पण प्रयत्न केला तर फळ (चप्पल) हमखास मिळते**. आम्हाला वाटले आजची शिकवणी संपली, पण गुरूंच्या मनात काही वेगळेच होते, त्यांनी शिकवण नीट लक्षात राहण्यासाठी असेल किंवा आमच्या लोकाग्रहास्तव असेल पण हा प्रकार दोन वेळा झाला .. धन्य ते गुरु.

एका गुरूंची ही शिकवणी बघून दुसऱ्या गुरूंनासुद्धा स्फुरण चढले. झाले असे की, शिकवणी घेणारा शिष्य एक चप्पल आणताना दुसरी चप्पल तशीच सोडून जात होता. का कोण जाणे त्याला आमच्यावर खूपच विश्वास होता. तर, गुरु-२ ह्यांना लक्षात आले की चपलेचा मालक एका चपलेच्या मोहापायी दुसरी चप्पल तिथेच सोडून जात आहे, तेव्हा ह्या गुरूंनी दुसरी चप्पल प्रवाहाच्या दिशेने अशी काही फेकली की कोणालाच सापडली नाही.. ह्यातून ह्या गुरुंनी दोन नवीन गोष्टी शिकवल्या, **हातचे सोडून पळत्याच्या मागे लागल्याने हातचे असलेले पण गमवायची वेळ येते.** तुझ्या चपलेचा राखणदार तूच आहेस.

ह्या शिकवणी आम्हाला प्रात्यक्षिकासह फुकटात बघायला मिळत असल्याचा आनंद होत होता, मात्र नंतर जेव्हा सर्वांच्या योगदानातून नवीन चप्पल घेऊन शिष्याचा सत्कार करायचा असे ठरले तेव्हा आम्हालाही शिकवण मिळाली **"There is no such thing as free lunch."**

कदाचित ह्या प्रसंगातून तुम्हालाही असेच मार्गदर्शन करणाऱ्या मित्रमैत्रिणींची आठवण होईल. तेव्हा ते प्रसंग तुम्हाला खोडकर किंवा फालतू मस्करी वाटले असतील पण कदाचित त्यामागचे ज्ञान टिपायला तुम्ही कमी पडला असाल. म्हणून नीट आठवून बघा आणि पुढच्या गुरुपौर्णिमेला त्यांचे आभार मानायला विसरू नका !

-संदीप बिडये





मिलाफ

ज्योती रानडे

आरतीनं शिताफीने तिची टोयोटा कॅमरी पटेल ब्रदर्सकडे वळवली आणि मागे बसलेल्या दहा वर्षांच्या अमरने आणि आठ वर्षांच्या सियाने "मॉऽऽऽऽम.." असा तक्रारीचा सुर लावला. दिवाळी अगदी चार दिवसांवर आली होती. या वर्षी आरतीला ऑफिसमधील कामामुळे लाडू चिवडा बनवण्यास देखील वेळ झाला नव्हता.
"I don't like chivda. Just make ladoos instead." सियानं फर्माईश केली.
"Are we going to Grandma's for thanksgiving?" अमरचा प्रश्न ऐकून आरती उखडली..
"I don't know, Amar!" ग्रँडमाकडे थँक्सगिव्हिंग साठी १५-२० नातेवाईक दरवर्षी जमत पण आरती त्यात हरवून जात असे. शिवाय आरती सारख्या शाकाहारी व्यक्तीसाठी तिथे फार काही पर्याय नसत. ग्रँडपा जॉन सिनिअर प्रेमाने व्हेजी बर्गर बनवत पण तो तिच्या घशाखाली उतरत नसे.

दिवाळी तिच्यासाठी केवळ सण नव्हता. तिचं बालपण, तिचे आई-बाबा-दादा आणि सनातन हिंदू संस्कृतीची ओळख दाखवणारा एक सोहळा होता. मुलांच्या मनातही हे सगळं रुजावं यासाठी ती प्रयत्न करत होती. अज्ञानाच्या अंध:कारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणाऱ्या दिवाळीचं मुलांना विशेष काही वाटत नाही हे तिला दिसत होतं.
समाजातील आसपासची चार घरं पणत्या उजळवत नसतील, लक्ष्मीपूजन करत नसतील तर मुलांना तरी दिवाळीचं वातावरण परक्या देशात कसं कळणार याची तिला जाणीव होती. यावर्षी तर दिवाळी व थँक्सगिव्हिंग, दोन्ही नोव्हेंबरमध्ये आल्यामुळे आरतीची धावपळ फारच वाढली होती.

मराठमोळी आरती अमेरिकेत जेव्हा शिक्षणासाठी आली तेव्हा बॉस्टन युनिव्हर्सिटी मधे टिचिंग असिस्टंट म्हणून काम करणारा जॉन आधी मित्र व नंतर सर्वस्व कधी झाला तिचं तिलाच कळलं नाही. "Will you marry me?" या जॉनच्या प्रश्नाचं उत्तर तिनं Yes देऊन अनामिकेवरील अंगठीत तळपणारा हिरा आईला दाखवला आणि आई भडकली. बाबांनी आईची कशीबशी समजून काढली आणि जॉन व आरती चतुर्भुज झाले. तेव्हा पासून दोन पूर्ण भिन्न संस्कृतींमधील ओढाताण सुरू झाली.

जॉनचे ममा-पपा कॅथलिक चर्चमध्ये नियमितपणे जात असतं. रविवारचा Mass त्यांनी कधी चुकवला नाही. आरती भारतीय सणवार मनापासून करणारी होती. गणेशचतुर्थीची आवर्तनं आणि लक्ष्मीपूजन साग्रसंगीत झाल्याशिवाय तिला शांती मिळत नसे. परंतु या दोन पूर्ण वेगळ्या संस्कृतींचा मिलाफ घालणं तिला जड जात होतं. मुलं जसजशी मोठी होऊ लागली तसे त्यांचे प्रत्येक गोष्टीतले why प्रश्न वाढत जाऊ लागले. बॉस्टन मधे थँक्सगिव्हिंगचे वारे वहात असताना मुलं चिवडा-लाडूचा फराळ आणि पणत्यांमध्ये रमत नव्हती. आकाश कंदील आणि तोरण बघून त्यांचे चेहरे खुलत नव्हते. मुलं झोपताच आरतीनं शांतपणे बेसनाचे लाडू वळले. जॉनला बेसनाचे लाडू मनापासून आवडत असत. त्यानं एक लाडू तोंडात टाकला. "Delicious!" त्यानं तिला हाताला धरून कोचावर बसवले. दोन कपात पेपरमिंट टी करून आणला.. "Aarti, if you ask me, there is no difference between Diwali and Thanksgiving! आपण मुलांना हे समजावून सांगू!" जॉन तिच्या पाठीवर थोपटून झोपायला गेला.

हे दोन सण सारखे म्हणणाऱ्या जॉनला दिवाळीचा अर्थच कळलेला नाही असं आरतीला वाटून गेलं. ती लहान असतानाची दिवाळी तिला आठवली. पहाटे तेल लावून, अभ्यंग स्नान करून सारी नातवंडं गावातच राहणाऱ्या आजीकडे फराळासाठी जमत. तो जमाना खणाचं परकर पोलकं, नारायण पेठ साड्या, आणि नेहरू शर्ट-पायजमा घालणारा होती. आया बहिणी साधं पावडर कुंकू लावून तयार होत असतं. घराघरातून टांगलेले कलात्मक आकाश कंदील, लाडू-चकलीच्या वासानं चाळवलेली भूक, आणि सात्विकतेत न्हाऊन

निघालेल्या पणत्या बघून मन प्रसन्न होत असे. फुलबाज्या आणि फटाक्यांच्या आवाजात कॅरम-पत्ते खेळत दिवाळीची सुट्टी संपत असे. ही पुण्यातील दिवाळी आरतीला फार प्रिय होती. मात्र दिवाळीच्या साऱ्या नित्यकर्मांमधे ती आजीचं एक अतिशय महत्त्वाचं वाक्य विसरून गेली होती..."मुलांनो, दिवाळी केवळ दिव्यांचा, प्रकाशाचा आणि नवीन कपड्यांचा सण नाही बरं का. हा कृतज्ञता व्यक्त करण्याचा पवित्र उत्सव आहे!" आजी सकाळी फराळ सुरू असताना नेहमी दिवाळीचा खरा अर्थ सांगत असे..
"वसुबारस हा गाय- वासरू यांच्या पूजनाचा व त्यांच्या प्रती कृतज्ञता दाखवण्याचा दिवस, धनत्रयोदशी हा आरोग्य आणि संपत्तीबद्दल कृतज्ञता दाखवण्याचा, लक्ष्मीपूजन- पैसा आणि समृद्धीबद्दल कृतज्ञता दाखवण्याचा, नवरा बायको मधल्या प्रेमाचा पाडवा आणि बहिण भावांच्या पवित्र नात्यांचे आभार मानणारी भाऊबीज!" आजीची वाक्यं आठवून आरती ताडकन उठून बसली. खरंच.. कृतज्ञता वृद्धिंगत करणारे हे दोन सण - दिवाळी व थँक्सगिव्हिंग - आपल्यापेक्षा जॉनलाच जास्त समजले आहेत! आपण मात्र विधी, नित्यकर्म आणि फराळात अडकलो आहोत. या सणांचा खरा गाभा कृतज्ञता आहे हे जॉनला किती पटकन समजलेय! त्या विचाराने तिचं मन एकदम हलकं झालं. आता मुलांच्या why प्रश्नांची उत्तरं देणं सोपं होतं.

सकाळी मुलं उठली तेव्हा आईचा वेगळा मूड बघून खूष झाली. "Did grandma invite us over for thanksgiving?" अमरच्या डोळ्यापुढे टर्की, स्टफिंग, मॅश्ड पटेटोज, क्रॅनबेरी सॉस, ॲपल पाय दिसत होतं. सुरेख सजवलेल्या जेवायच्या टेबलावर John, Senior आजोबा, आपलं कुटुंब आणि अन्न, वस्त्र, निवारा दिल्याबद्दल थरथरत्या आवाजात ईश्वराजवळ कृतज्ञता व्यक्त करत. अमरला ते वातावरण मनापासून आवडत असे..

कठीण वाटणारा गुंता अचानक सुटला म्हणून आरती हसली. "अमर, दिवाळीसाठी मी त्यांना इथे बोलावलय आणि थॅंक्सगिव्हिंगसाठी आपण त्यांच्याकडे जाणार आहोत." सिया Yay म्हणत आईजवळ येऊन बसली. नेहमी केवळ दिवाळी जोरात करणारी आई आता दोन्ही सणांना सर्वांनी एकत्र यायचं म्हणताच मुलं खूष झाली..

"अमर आणि सिया- वरवर दिवाळी व थँक्सगिव्हिंग हे सण तुम्हाला खूप वेगळे वाटतील पण खरं तर ते अगदी सारखे आहेत. आपल्याला जे जे मिळतं त्याबद्दल आपण परमेश्वराचे थॅंक्स मानायचे हा या दोन्ही सणांचा हेतू आहे! नवे कपडे, उत्तम जेवण, पत्ते, कॅरम, बोर्डगेम खेळत अन्न पाणी देणाऱ्या निसर्गाचे व परमेश्वराचे आभार मानायचे! याला कृतज्ञता म्हणतात.." Kru.. what?"
अमरचा प्रश्न ऐकून सिया खुदकन हसली. "He cannot say Kru-nta" म्हणत ती लाजली. "कृतज्ञता.. Gratitude म्हणजे आभार व्यक्त करायचे, यासाठी हे सण आहेत. मजा आहे ना? किती वेगळे दोन देश आहेत पण कृतज्ञता व्यक्त करणं मात्र अगदी सेम टू सेम आहे!"
जॉन कॉफी घेत आरतीचं बोलणं कौतुकाने ऐकत उभा होता.



दिवाळीचा दिवस उजाडला. ग्रँडमा-ग्रँडपा आल्याने मुलं खूष झाली होती. त्यांचे चेहरे जॉननं लावलेल्या फुलबाज्यांच्या प्रकाशात उजळून निघाले होते..
दिवाळीचं साग्रसंगीत जेवणं व फराळ करताना ग्रँडमानं आरतीला कौतुकाने विचारलं," बेसन लाडू, गुलाबजाम वगैरे थॅंक्सगिव्हिंग फिस्ट साठी आणता येतील?"आरतीनं होकारार्थी मान डोलावली.



थॅंक्सगिव्हिंगचा दिवस उजाडला.. यावेळी थॅंक्सगिव्हिंगला ॲपल पाय, पंपकिन पाय शेजारी बेसन लाडू, गुलाबजामही दिमाखात विराजमान झाले होते. 'So delicious' म्हणून पाहुणे खात होते. रेसिपी विचारत होते.

जॉन सिनिअर आजोबा कृतज्ञता व्यक्त करत थरथरत्या आवाजात बोलू लागले.
"Heavenly Father, I come before you today with a heart full of gratitude...
मुलांचे जोडलेले हात, कृतज्ञतेनं ओथंबलेले चेहरे आणि सुंदर प्रार्थना ऐकताना दोन संस्कृतींचा अप्रतिम मिलाफ झालेला बघून आरती व जॉन सुखावून गेले! आता भारतीय व अमेरिकन संस्कृती जपत आपली मुलं वाढणार याची आरतीला खात्री होती..

जॉनच्या मिटलेल्या डोळ्यापुढे जिझस होता आणि आरतीच्या मिटलेल्या डोळ्यापुढे गणेश.. एवढाच काय तो फरक होता..

Happy Diwali and Happy Thanksgiving to all my readers!

-ज्योती रानडे





जुन्याचं नवं रूप

स्मिता कुलकर्णी

आमचा एक मित्र स्क्रॅप वूडच्या साध्यासुध्या तुकड्यांतून अप्रतिम कलाकृती घडवतो. त्याच्यासारखं लाकूडकामाचं कौशल्य माझ्याकडे नसले तरी रंग, सजावट आणि कल्पकतेच्या मदतीने त्या लाकडी तुकड्यांना नवसंजीवनी देण्याचा मी आवडीने प्रयत्न करते. अशा वस्तूंचं अपसायकलिंग करत त्यांना नवं रूप देणं हा माझा आवडता छंद आहे. थोडासा रंग, वेगळं टेक्शचर आणि ऋतू आणि सणांची थीम घेऊन साजेशी सजावट केली की त्या निर्जीव तुकड्यांतून सुंदर कलाकृती आकाराला येऊ लागतात. सर्वसामान्य वाटणाऱ्या वस्तूचं काहीतरी वेगळं आणि आकर्षक रूपांतरण होताना पाहण्याचा आनंद खरोखरच अवर्णनीय असतो.

क्राफ्ट्सच्या दुकानांत फेरफटका मारताना अशाच कल्पनांना नवे पंख फुटतात. तिथे मांडलेल्या असंख्य अनफिनिश्ड लाकडी वस्तू सृजनशीलतेला जणू आमंत्रणच देत असतात. त्याच प्रमाणे वेगवेगळ्या आकाराच्या, रंगांच्या आकर्षक बाटल्या दिसल्या की माझी कल्पकता अधिक जागृत होऊ लागते. अशा दुकानात गेले की नवीन डीआयवाय प्रकल्पांचं एक वेगळंच विश्व माझ्यासमोर उलगडू लागतं.



अशाच एका खजिन्यातून एकदा काही वस्तू घेतल्या आणि रंगकामाच्या प्रयोगांना सुरुवात केली. युट्युब व्हिडीओंमुळे खूप माहिती मिळाली. रंगांच्या जगात शिरताच वेगवेगळ्या प्रकारचे रंग, त्यांची वैशिष्ट्यं असं सगळं हळूहळू उलगडत गेलं. लाकडी वस्तूंवर रंगकाम करताना उत्तम परिणाम मिळवण्यासाठी लाकडासाठी खास तयार केलेले रंग वापरणं महत्त्वाचं असतं. कारण लाकूड हे छिद्रयुक्त असतं; त्यामुळे निवडलेले रंग आणि प्रायमर व्यवस्थित चिकटपणा आणि टिकाऊपणा देणारे असावेत हे उमगायला लागलं. मग चॉक पेन्ट्सचा वापर सुरु केला. त्यांची घनता दाट असल्यामुळे ते सफाईदारपणे लाकडावर बसतात. चॉक पेंट वाळायला जरा वेळ लागतो, मात्र पूर्णपणे वाळल्यावर त्यातून एक छान, आकर्षक पोत तयार होतो (ज्याला आपण टेक्श्चर म्हणतो). त्यानंतर पुढचा थर बाजारात मिळत असलेल्या फिनिशिंग उत्पादनांचा वापर करून आणखी उठावदार करता येतो आणि आपल्या पसंतीनुसार वेगळा लूक मिळवता येतो. चॉक पेंट्सच्या प्रयोगातून रंगांच्या जगाची ओळख अधिक समृद्ध झाली. या रंगांच्या दाट पोतामुळे लाकडी आणि काचेच्या पृष्ठभागांवर सुंदर परिणाम साधता येतात. विविध फिनिशिंग तंत्रांचा वापर करून विंटेज किंवा आधुनिक अशा अनेक शैली सहज साकारता येतात.

ही हस्तकला करत असताना रंग लावण्यासाठी दर्जेदार ब्रशेस असणे किती महत्वाचे आहे ते मी स्वानुभवाने शिकले आणि अशा गोष्टी बनवताना पुरेसा वेळ आणि कमालीच्या सबुरीची व चिकाटीची आवश्यकता असते तेही शिकले. असे केल्यास बहुतेक वेळा आकर्षक आणि समाधानकारक परिणाम मिळवणे साध्य होते. एखादी चूक झाली किंवा अपेक्षित लूक मिळाला नाही, तर कित्येक वेळा मी पहिला रंग पूर्णपणे वाळू देऊन पुन्हा एकदा नव्याने रंग देऊन सुरुवात केली आहे. अनेकदा अंतिम वस्तूला अधिक उठावदार आणि टिकाऊ स्वरूप देण्यासाठी रंगाचे अनेक थर द्यावे लागतात. कालांतराने टेक्श्चर, स्पंज पेंटिंग आणि इतर सजावटीच्या पद्धतींचेही प्रयोग करत गेले.

काही कलाकृतींमध्ये मी थोडा वेगळेपणा साधण्यासाठी ट्रान्सफर पेपर आर्टचा वापर करते. उदाहरणार्थ, मी तयार केलेल्या "Breathe" या फलकावरील नाजूक रचना त्याचे सौंदर्य अधिक खुलवते आणि त्या वस्तूला एक वेगळी कलात्मक ओळख देते. ट्रान्सफर पेपर आर्टसाठी लागणारी विविध डिझाइन्स आणि साहित्य हस्तकला दुकानांमध्ये तसेच ऑनलाइन सहज उपलब्ध असतात.



आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे शेवटी वस्तू पूर्णपणे वाळल्यानंतर तिच्यावर वार्निश किंवा सीलंटचा थर देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे ती दैनंदिन वापरात जास्ती टिकू शकते.

हस्तकलेची आवड असल्यामुळे माझ्यासाठी प्रत्येक सण आणि ऋतू हा नव्या कल्पनांच्या प्रयोगांची संधी घेऊन येतो. व्हॅलेंटाईन्स डे, इस्टर, मदर्स डे, दिवाळी, हॅलोवीन, थँक्सगिव्हिंग, ख्रिसमस अशा विविध थीम्सवर आधारित सजवलेल्या बाटल्या आणि इतर हस्तनिर्मित वस्तू तयार करताना अनेकदा त्या मित्रमैत्रिणींना भेट देण्याचं भाग्य लाभलं आणि त्या आनंदाने या छंदाची गोडी अधिकच वाढली. आमच्या लाडक्या रेवा डॉगीने प्रेमाने जमवून आणलेल्या अनेक काठ्यांपैकी दोन काठ्यांना तिच्या गोड आठवणींची उजाळा देत, थोडी कल्पकता वापरून नव्या रूपात सजवलं आहे. त्यांचे सजलेले रूप इथे एका छायाचित्रात पहायला मिळेल.

माझ्या मते, वेळ, कल्पकता आणि मनापासून केलेली मेहनत यांची गुंफण असलेली हस्तनिर्मित भेट कोणत्याही विकतच्या वस्तूपेक्षा अधिक मौल्यवान असते. कारण त्या वस्तूमध्ये केवळ रंग आणि साहित्य नसतं, तर त्यामागे असतो आपला वेळ, आपली सृजनशीलता आणि आपुलकीची ऊब. कदाचित म्हणूनच एखाद्या लाकडाच्या तुकड्याला नवं रूप देताना किंवा वापरून झालेल्या काचेच्या बाटलीला सजवताना मला केवळ एक कलाकृती घडवल्याचा नाही, तर एका विस्मृतीत गेलेल्या वस्तूला नवजीवन दिल्याचा आनंद मिळतो.

-स्मिता कुलकर्णी













My Mandala Art

Kate Derosier

For me, art is a great way to be in the moment – focus on only the mark you're making right now, and nothing else. Symmetrical designs are especially good for this, because when you're repeating and completing the pattern, there's not as many chances to get caught up in thoughts.

The design below and the cover page were both drawn digitally. For the one below, I was experimenting with some shapes borrowed from rangoli and mehndi designs, as well as some shapes from architecture. For the red and orange Fall Mandala on the front page, I wanted to include influences from Celtic art, especially knot designs.



मृत्यूच्या दरीतून परतताना... एक अविस्मरणीय अनुभव

आशिष पुजारी

काही प्रवास आपण ठरवतो, तर काही प्रवास आपल्याला घडवतात. काही ठिकाणं पाहून आपण परततो, तर काही ठिकाणं आपल्या मनात कायमची घर करून राहतात. तिथला निसर्ग, तिथली माणसं किंवा एखादा विलक्षण अनुभव आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनून जातो. काळ पुढे सरकतो, आठवणींचे रंग काहीसे फिके होतात; पण एखादा क्षण असा असतो की डोळे मिटताच तो पुन्हा तितक्याच तीव्रतेने समोर उभा राहतो. नोव्हेंबर २०२४ मधील डेथ व्हॅलीचा आमचा प्रवास हा असाच एक अनुभव ठरला.

अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यात वसलेली डेथ व्हॅली म्हणजे निसर्गाच्या रौद्र आणि अद्‌भुत सौंदर्याचा विलक्षण संगम. दूरवर पसरलेली रखरखीत भूमी, उंचसखल पर्वतरांगा, क्षितिजाला भिडणारे निर्मनुष्य रस्ते आणि सभोवतालची गूढ शांतता. जगातील सर्वाधिक उष्ण प्रदेशांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भूमीचं आकर्षण आम्हालाही होतंच. मित्रपरिवारासोबत डेथ व्हॅलीला जाण्याचा बेत आखला होता. माझी पत्नी, आमच्या दोन्ही मुली आणि मी, असे चौघे एका काळ्या मिनिव्हॅनमधून प्रवास करत होतो. त्या दिवशी आमचा डेथ व्हॅलीतील मुक्काम सुरू होणार होता. रिसॉर्टवर पोहोचून चेक-इन करायचं, थोडी विश्रांती घ्यायची आणि पुढच्या भटकंतीची आखणी करायची, असा साधासुधा कार्यक्रम होता. मात्र त्या रात्री डेथ व्हॅली आम्हाला निसर्गाचं सौंदर्य दाखवण्याआधी आयुष्याचा एक वेगळाच धडा शिकवणार होती, याची पुसटशी कल्पनाही नव्हती.

रात्रीचे साधारण नऊ वाजले होते. रिसॉर्ट अजून अर्ध्या तासाच्या अंतरावर होतं. सभोवताली अंधार दाटून आला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना डोंगरांच्या काळ्याकभिन्न आकृत्या दिसत होत्या. मधूनच येणारी तीव्र वळणं, उतार आणि दूरवर पसरलेला निर्जन परिसर. शहरातल्या रस्त्यांवर असणारी दिव्यांची रोषणाई, दुकानांची लगबग किंवा माणसांची वर्दळ यांपैकी काहीच तिथे नव्हतं. आमची गाडी एका तीव्र उतारावरून खाली जात होती आणि अचानक एक अनपेक्षित गोष्ट घडली.

ब्रेक दाबूनही गाडीचा वेग अपेक्षेप्रमाणे कमी होत नव्हता! सुरुवातीला क्षणभर विश्वासच बसला नाही. पुन्हा ब्रेक दाबून पाहिला. पण गाडीचा वेग हवा तसा कमी होईना. समोर उतार, त्यावर वळणावळणाचा रस्ता आणि गाडीत माझं संपूर्ण कुटुंब! क्षणभर काळजात धस्स झालं. आयुष्यात आपण अनेकदा संकटांना सामोरं जातो. पण काही संकटं अशी असतात की त्यांची चाहूल लागेपर्यंत ती थेट आपल्या समोर उभी ठाकलेली असतात. विचार करण्यासाठी वेळ नसतो, मागे फिरण्याचा मार्ग नसतो आणि निर्णय चुकला तर त्याची किंमत किती मोठी असू शकते, याची जाणीव मात्र असते. त्या क्षणी माझ्या मनात सर्वप्रथम विचार आला तो पत्नीचा आणि मुलींचा. काहीही झालं तरी त्यांना सुखरूप बाहेर काढायचं होतं. भीती होतीच. पण त्या भीतीला शरण जाण्याची मुभा नव्हती. हात स्टिअरिंगवर घट्ट रोवलेले होते. नजर समोरच्या रस्त्यावर खिळलेली होती. गाडी कशी थांबवायची, हाच एक विचार डोक्यात वेगाने सुरू होता आणि या सगळ्या धडपडीत मनात अखंड सद्‌गुरूंचं स्मरण सुरू होतं. एरवी आपण देवाचं, सद्‌गुरूंचं स्मरण करतो, प्रार्थना करतो. पण संकटाच्या त्या टोकाच्या क्षणी मनातून उमटणारी प्रार्थना काही वेगळीच असते. तिला शब्दांचं अवडंबर नसतं, विधींची गरज नसते. असते ती केवळ एक आर्त हाक. सद्‌गुरू, या संकटातून माझ्या कुटुंबाला सुखरूप बाहेर काढा!

माझे हात गाडी नियंत्रित करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते आणि मन सद्‌गुरूंच्या चरणी धाव घेत होतं. तेवढ्यात रस्त्याच्या बाजूला एक आपत्कालीन थांबण्याची जागा नजरेस पडली. उतारावर नियंत्रण सुटलेल्या वाहनांना थांबवण्यासाठी तयार केलेली ती जागा होती. क्षणाचाही विलंब न करता मी गाडी त्या दिशेने वळवली आणि अखेर गाडी थांबली! त्या क्षणी नेमकं काय वाटलं, हे आजही शब्दांत सांगणं कठीण आहे. काही क्षणांपूर्वी ज्या गाडीचा वेग कमी करण्यासाठी जीवाचा आटापिटा सुरू होता, ती आता एका जागी निश्चल उभी होती. गाडीजवळ जळल्यासारखा वास येत होता. पण आम्ही चौघेही सुरक्षित होतो. क्षणभर मन सुन्न झालं. त्यानंतर जाणवली ती एक विलक्षण कृतज्ञता. सद्‌गुरूंच्या कृपेने निदान गाडी तरी थांबवता आली होती!

मात्र संकटाचा पहिला अंक संपला असला, तरी पडदा अजून पडायचा होता.

गाडी थांबली होती ती एका निर्जन डोंगराळ रस्त्यावर. बाहेर मिट्ट काळोख होता. बोचरी थंडी जाणवत होती. आसपास कोणतीही वस्ती नव्हती. रस्त्यावर वाहनांची ये-जा तुरळक होती. त्यात भर म्हणजे मोबाईलला नेटवर्क नव्हतं. आजच्या आधुनिक जगात मोबाईल म्हणजे जणू आपल्या हातातलं जग. पण त्या रात्री तो हातात असूनही निरुपयोगी ठरत होता. ना कुणाला फोन करता येत होता, ना आपली अडचण कुणापर्यंत पोहोचवता येत होती. आम्ही रस्त्याच्या कडेला उभे राहून टॉर्चचा प्रकाश हवेत फिरवत येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांकडे मदतीची याचना करू लागलो. दूरवर एखाद्या वाहनाचे दिवे दिसले की मनात आशेची पालवी फुटायची. कदाचित हे वाहन थांबेल, कदाचित आता मदत मिळेल! पण वाहन पुढे निघून गेलं की पुन्हा तीच प्रतीक्षा, तोच अंधार आणि तीच अनिश्चितता.

अशा वेळी नकळत माझी नजर आकाशाकडे गेली. आणि क्षणभर मी स्तब्ध झालो. खाली जमिनीवर भयाण काळोख पसरला होता; पण वर आकाशात मात्र एक वेगळंच विश्व खुललं होतं. शहरातल्या कृत्रिम प्रकाशापासून कितीतरी दूर, प्रदूषणाचा लवलेश नसलेलं स्वच्छ, निरभ्र आणि अथांग आकाश! त्या आकाशात असंख्य तारे लुकलुकत होते. जणू कुणीतरी काळ्याशार मखमली वस्त्रावर अगणित हिरे उधळले होते. नजर जाईल तिथपर्यंत तारकांचं साम्राज्य पसरलं होतं. इतकं सुंदर, इतकं विशाल आणि इतकं स्वच्छ तारांगण मी क्वचितच पाहिलं होतं. किती विलक्षण विरोधाभास होता तो! ज्या अंधाराने आमच्या मनात भीती निर्माण केली होती, त्याच अंधारामुळे आकाशातलं हे अद्‌भुत सौंदर्य इतक्या स्पष्टपणे दिसत होतं. खाली आम्ही चार माणसं, एका अनपेक्षित संकटात अडकलेली. आणि वर अनंत अवकाश, असंख्य तारे आणि विश्वाची अथांग शांतता. त्या क्षणी निसर्गाच्या विराट अस्तित्वापुढे माणूस किती लहान आहे, याची जाणीव झाली. आपल्या चिंता, आपली धावपळ, आपल्या महत्त्वाकांक्षा—या सगळ्यांच्या पलीकडे कितीतरी मोठं विश्व अस्तित्वात आहे. मनात भीती अजूनही होती. पण त्या तारकांनी भरलेल्या आकाशाने काही क्षणांसाठी का होईना, मनाला एक वेगळीच शांतता दिली. अंधार कितीही गडद असला, तरी त्यात प्रकाशाचं अस्तित्व संपत नाही, याची जणू ती निःशब्द आठवण होती आणि खरोखरच, थोड्याच वेळात त्या अंधारात आमच्यासाठी आशेचा एक किरण दिसला. एक गाडी आमच्याजवळ येऊन थांबली. गाडीत एक वृद्ध महिला होत्या. त्या एकट्याच प्रवास करत होत्या. रात्रीच्या वेळी, अशा निर्मनुष्य परिसरात, रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या अनोळखी माणसांसाठी गाडी थांबवणं ही काही साधी गोष्ट नव्हती. स्वतःच्या सुरक्षिततेचा विचार करून पुढे निघून जाणं त्यांच्यासाठी सहज शक्य होतं. पण त्या थांबल्या. त्यांनी आमची विचारपूस केली. आम्ही त्यांना घडलेला प्रसंग सांगितला. गाडीच्या ब्रेकची समस्या, मोबाईलला नेटवर्क नसणं आणि मदतीची आवश्यकता—सगळं समजावून सांगितलं. त्यांनी आमचं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलं आणि मग विचारलं, आमच्याकडे पाणी आहे का? मुलींसाठी काही खायला आहे का? त्या प्रश्नांनी मनाला स्पर्श केला. स्वतः एकट्या प्रवास करत असलेल्या त्या महिलेच्या मनात सर्वप्रथम काळजी होती ती आमच्या मुलांची! त्या अनोळखी महिलेच्या शब्दांतली आपुलकी त्या भयाण रात्री विलक्षण आधार देऊन गेली. त्यांनी आमचे फोन नंबर आणि आमच्या मित्रांचे संपर्क क्रमांक लिहून घेतले. पुढे मोबाईलला नेटवर्क मिळाल्यावर पार्क रेंजरला आणि आमच्या मित्रांना संपर्क करण्याचं सांगून त्या निघाल्या. त्यांच्या गाडीचे दिवे हळूहळू अंधारात विरून गेले. आम्ही पुन्हा त्या निर्जन रस्त्यावर उरलो होतो. पण आता मनात आशेचा एक धागा निर्माण झाला होता. त्या महिलेने दिलेला शब्द पाळला. पुढे नेटवर्क मिळताच त्यांनी पार्क रेंजरशी संपर्क साधला. आमच्या मित्रांनाही कळवलं. त्यांच्या त्या एका कृतीने आमच्यापर्यंत मदत पोहोचण्याचा मार्ग मोकळा झाला. आजही त्या प्रसंगाचा विचार केला की मन भरून येतं. ना ओळख, ना नातं, ना कोणती अपेक्षा. तरीही एका अनोळखी कुटुंबासाठी थांबून, त्यांची विचारपूस करून, मदतीची व्यवस्था करण्यासाठी प्रयत्न करणं—यालाच तर माणुसकी म्हणतात! आपण अनेकदा देवाच्या अस्तित्वाविषयी, श्रद्धेविषयी चर्चा करतो. पण त्या रात्री माझ्यासाठी त्या महिलेच्या रूपाने माणुसकीचं एक अत्यंत सुंदर दर्शन घडलं. सद्‌गुरूंच्या कृपेची अनुभूती मला त्या अनपेक्षित मदतीतही जाणवत होती.

काही वेळाने दूरवरून चमकणारे दिवे आमच्या दिशेने येताना दिसले. ती पार्क रेंजरची गाडी होती! आमच्या मनावरचं एक मोठं ओझं हलकं झालं. रेंजरने आमची परिस्थिती समजून घेतली आणि गाडीची तपासणी केली. पण त्यानंतर जे घडलं, ते तितकंच अनाकलनीय होतं. त्याला गाडीत कोणताही स्पष्ट बिघाड दिसला नाही! काही वेळापूर्वी तीव्र उतारावर ज्या गाडीचे ब्रेक अपेक्षेप्रमाणे काम करत

नव्हते, तीच गाडी आता व्यवस्थित असल्यासारखी वाटत होती. मनात प्रश्नांचं काहूर माजलं. मग त्या उतारावर नेमकं काय घडलं होतं? गाडी अचानक नियंत्रणाबाहेर जाण्याची वेळ का आली होती? आणि आता ती पुन्हा व्यवस्थित कशी काय चालत होती? मात्र त्या क्षणी या प्रश्नांची उत्तरं शोधण्यापेक्षा सुरक्षितपणे रिसॉर्टवर पोहोचणं अधिक महत्त्वाचं होतं. रेंजरने एक मार्ग सुचवला. तो माझ्या पत्नीला आणि मुलींना आपल्या गाडीत घेऊन जाणार होता. मी आमची गाडी अत्यंत सावकाश चालवत त्याच्या मागून जायचं होतं. त्याने खबरदारी म्हणून आपल्या वाहनाचे सायरनचे दिवे सुरू ठेवले. माझं कुटुंब रेंजरसोबत सुरक्षितपणे प्रवास करणार होतं, हीच माझ्यासाठी मोठी दिलासादायक बाब होती. मी पुन्हा गाडी सुरू केली. मनात धाकधूक होतीच. प्रत्येक उतार, प्रत्येक वळण आता अधिक सावधपणे पार करावं लागत होतं. काही वेळापूर्वीचा प्रसंग विसरणं अशक्य होतं. पण आश्चर्य म्हणजे गाडी व्यवस्थित चालत होती.

रेंजरच्या गाडीचे चमकणारे दिवे पुढे होते आणि मी त्याच्या मागून सावकाश मार्गक्रमण करत होतो. याच दरम्यान आणखी एक अनपेक्षित गोष्ट घडली. आमच्या अडचणीची माहिती मिळताच मित्रपरिवाराने मदतीसाठी केलेली धडपड आणि दाखवलेली आपुलकी आमच्यासाठी मोठा आधार ठरली. संकटाच्या प्रसंगी आपल्या माणसांची साथ किती मोलाची असते, याचीही त्या रात्री नव्याने जाणीव झाली. मात्र आता आम्ही रेंजरच्या मदतीने सुरक्षितपणे पुढे जात होतो. प्रत्येक मैलागणिक रिसॉर्ट जवळ येत होतं आणि अखेर आम्ही रिसॉर्टवर सुखरूप पोहोचलो!

त्या क्षणी मनात उमटलेली भावना शब्दांच्या पलीकडची होती. काही तासांपूर्वी आम्ही आनंदाने सहलीला निघालेलो एक कुटुंब होतो. आता मात्र एका जीवघेण्या प्रसंगातून सुखरूप बाहेर पडल्याचं समाधान आणि कृतज्ञता मनात दाटून आली होती. दुसऱ्या दिवशी गाडीची मेकॅनिककडून तपासणी करून घेतली. पण त्यालाही कोणताही स्पष्ट बिघाड आढळला नाही. त्या उतारावर ब्रेकच्या कार्यक्षमतेत अचानक बदल का झाला होता, याचं निश्चित उत्तर आम्हाला मिळालं नाही. त्यामागे काही तांत्रिक कारण असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र त्या रात्रीचा अनुभव माझ्या मनात केवळ एका यांत्रिक समस्येची आठवण म्हणून राहिला नाही. त्या प्रसंगाने मला अनेक गोष्टी नव्याने शिकवल्या.

आपण आयुष्यात कितीतरी गोष्टी गृहीत धरून चालतो. उद्याचा दिवस आपलाच आहे, पुढच्या महिन्यात अमुक करू, पुढच्या वर्षी तमुक ठिकाणी जाऊ, मुलांसाठी हे करू, कुटुंबासाठी ते करू—असं भविष्याचं चित्र आपण सतत रंगवत असतो. पण आयुष्याच्या पुढच्या वळणावर काय दडलेलं आहे, हे आपल्याला माहीत नसतं. त्या रात्री मला सर्वांत प्रकर्षाने जाणवलं ते माझ्या कुटुंबाचं मोल. रोजच्या धावपळीत अनेकदा आपण अगदी साध्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतो. कुटुंबासोबत घालवलेला वेळ, मुलींचं हसणं, पत्नीशी होणाऱ्या गप्पा, एकत्र केलेलं जेवण—या सगळ्या गोष्टी किती अनमोल आहेत, याची जाणीव अशा प्रसंगांतून नव्याने होते. त्या रात्री माझ्या मनात कोणत्याही भौतिक गोष्टीचा विचार नव्हता. ना गाडीचा, ना प्रवासाच्या खर्चाचा, ना पुढच्या सहलीचा. मनात एकच इच्छा होती—माझं कुटुंब सुखरूप असावं!

सद्‌गुरूंवरील माझी श्रद्धाही त्या अनुभवाने अधिक दृढ झाली. श्रद्धा म्हणजे संकट येणारच नाही, अशी खात्री नव्हे. संकट आलं तरी त्याला सामोरं जाण्यासाठी मनाला मिळणारं बळ, असं तिचं स्वरूप मला त्या रात्री अधिक स्पष्टपणे जाणवलं.

गाडी थांबवण्यासाठी मी प्रयत्न केले. योग्य वेळी आपत्कालीन जागा दिसली. एका अनोळखी महिलेने मदतीसाठी थांबण्याचं धाडस दाखवलं. तिच्या प्रयत्नांमुळे पार्क रेंजरपर्यंत निरोप पोहोचला. रेंजरने आमची मदत केली आणि अखेर आम्ही सुखरूप रिसॉर्टवर पोहोचलो. या सगळ्या घटनांकडे पाहताना माझं मन आजही सद्‌गुरूंच्या चरणी नतमस्तक होतं.

त्या वृद्ध महिलेचं ऋणही आयुष्यभर मनात राहील. काही माणसं आपल्या आयुष्यात अगदी थोड्या वेळासाठी येतात. त्यांचं नाव, गाव, ओळख कदाचित काळाच्या ओघात विसरली जाते. पण त्यांच्या एका कृतीचा ठसा मनावर कायमचा उमटतो. त्या रात्रीच्या अंधारात भेटलेली ती महिला माझ्यासाठी अशीच एक व्यक्ती ठरली.

आणि त्या रात्रीचं ते तारकांनी भरलेलं आकाश? आजही त्याची आठवण झाली की मनात एक वेगळीच भावना दाटून येते. एका बाजूला जीवघेण्या संकटाची भीती, असहायता आणि अनिश्चितता होती; तर दुसऱ्या बाजूला निसर्गाने आपल्या विराट सौंदर्याची जणू सारी दारं उघडली होती. तेव्हा जाणवलेली एक गोष्ट आजही मनात घर करून आहे—अंधाराचं अस्तित्व जितकं खरं, तितकंच त्या अंधारात चमकणाऱ्या ताऱ्यांचंही.

आयुष्यातही कदाचित असंच असतं. संकटं येतात, भीती वाटते, मार्ग दिसेनासा होतो. पण अशा वेळी कुठेतरी आशेचा एखादा किरण असतोच. कधी तो स्वतःच्या प्रसंगावधानातून दिसतो, कधी आपल्या श्रद्धेतून बळ देतो, तर कधी एखाद्या अनोळखी माणसाच्या रूपाने आपल्यापर्यंत पोहोचतो.

डेथ व्हॅली! नावातच मृत्यूची दरी असलेला तो प्रदेश. पण माझ्यासाठी ती दरी आता केवळ मृत्यूच्या भयाची आठवण राहिलेली नाही. तिने मला आयुष्याचं मोल शिकवलं. कुटुंबाच्या प्रेमाची जाणीव अधिक गहिरी केली. श्रद्धेचं बळ अनुभवायला दिलं आणि माणुसकी वरचा विश्वास अधिक दृढ केला. त्या रात्री आम्ही मृत्यूच्या किती जवळ होतो, हे सांगता येणार नाही. पण एक गोष्ट मात्र निश्चित—त्या अनुभवाने आयुष्याकडे पाहण्याची माझी दृष्टी कायमची बदलली.

आजही डोळे मिटले की तो निर्जन रस्ता, तीव्र उतार, गाडी थांबवण्यासाठी केलेली धडपड, सद्गुरूंचं स्मरण, मदतीसाठी थांबलेली ती वृद्ध महिला आणि त्या भयाण अंधारावर पांघरलेलं असंख्य तारकांचं आकाश—सारं काही पुन्हा जिवंत होतं आणि मनात एकच भावना उरते. कृतज्ञता! सद्गुरूंच्या कृपेविषयी, मदतीला धावून आलेल्या माणसांविषयी आणि पुन्हा एकदा आपल्या प्रियजनांसोबत जगण्याची संधी मिळाल्याविषयी.

मृत्यूच्या दरीत गेलो होतो निसर्ग पाहायला... आणि परत आलो आयुष्य नव्याने समजून घेऊन!

-आशिष पुजारी





Hello Everyone,

In this special Diwali edition of Abhiruchi, we are proud to recognize MMSac community members who chose to go above and beyond by contributing additional funds to support our community.

This special group is led by Madhura and Rahul Sathe, whose generosity and commitment truly exemplify the spirit of giving back. Our MMSac Cares Patrons opted for the highest tier of membership we offer—not simply for additional benefits, but as a meaningful way to strengthen our community and support causes that make a difference. Their generosity has enabled MMSac to extend its impact beyond our own programs by supporting two inspiring charitable initiatives named Family House and E.A.R.T.H.

Aabha Ranade has done remarkable work supporting **Family House**, helping families during some of the most challenging times in their lives.

